१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | गुरुवार | दि. २९ ऑक्टोबर २०२६ | अंक १४३ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

पतीला पळवून नेल्याने खळबळ

रोहा : पतीला पळवून नेल्याची धक्कादायक घटना रोहे तालुक्यातील कोलाड भागात घडली आहे. या विषयी पीडित पतीच्या पत्नीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, रोहे तालुका समवेत संपूर्ण रायगड जिल्ह्यात अल्पवयीन मुली, तरुणी आणि विवाहित महिला बेपत्ता झाल्याचे घटना घडल्याची नोंद बहुतांश पोलीस ठाण्यांत करण्यात आली आहे. परंतु, चक्क पतीला पळवून नेल्याची घटना प्रथमच समोर येत असल्याने पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश दत्तात्रय वालेकर •>पान २ वर

स्पेनमध्ये भीषण रेल्वे अपघात

स्पेन : रेल्वेचा प्रवास हा सर्वाधिक सुरक्षित मानला जातो. परंतु, याच रेल्वेचे कधीकधी भीषण अपघात होतात. सध्या रेल्वे अपघाताची अशीच एक भयानक घटना स्पेनमध्ये घडली आहे. वेगात येणाऱ्या दोन रेल्वे एकमेकांवर धडकल्या आणि त्यात तब्बल ५० जणांचा जागीच मृत्यू झाला असून, २०० पेक्षा जास्त प्रवासी जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. स्पेनची राजधानी माद्रिदच्या दक्षिण भागातील आंदालुसिया या प्रदेशातील रेल्वे लाईनवर ही दुर्घटना घडली आहे. जानेवारी महिन्यात याच रेल्वे लाईनवर रेल्वे अपघाताची मोठी दुर्घटना झाली होती. या दुर्घटनेत तब्बल ४६ लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आता हा दुसरा रेल्वे अपघात समोर आलेला आहे.

सत्ताधारी खुर्चीसाठी लाचार

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा घणाघात



(छायाचित्र : अमोल नाईक)

टोरंटसाठी होणाऱ्या वृक्षतोडीविरोधात उठवला आवाज

। रायगड । कृषीवल टीम ।

मराठी माणसाला बेसावध ठेवून सह्याद्री संपविण्याचं षडयंत्र रचलं जातंय. ज्यांच्यावर विश्वास ठेवून आपण ज्यांना निवडून दिलं ते महाराष्ट्राचे आमदार, खासदार सत्तेच्या पदासाठी, खुर्चीसाठी लाचार झालेत, अशी घणाघाती टीका मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली. कर्जत येथे टोरंट प्रकल्पासाठी होणाऱ्या वृक्षतोडीविरोधात आवाज उठविण्यासाठी शुक्रवारी (दि.२८) आयोजित बचाव समितीच्या सभेत ते बोलत होते. छत्रपतींचे नाव घेता तर मावळे म्हणून गप्प बसू नका, हे दिल्लीश्वर महाराष्ट्र लुटायला आले आहेत, थंड बसाल तर आपला सह्याद्री ओरबाडून टाकतील, त्यांच्यापुढे महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांचे काही चालत नाही, असा जाहीर आरोपही राज ठाकरे यांनी केला.

राज ठाकरे यांनी यावेळी आपल्या भाषणाची सुरुवात करताना कर्जतमध्ये इंटरनेट बंद केले, पण सूर्य उगवायचा राहणार आहे का? अख्ख जग या बघतंय प्रकल्पाकडे, इंटरनेटचे काय करायचे? मनात काळे असेल तर अशा गोष्टी करायला सुचतात, अशी टिका राज ठाकरे यांनी केली. यापुढे ते म्हणाले की, सकाळी पाहणी दौऱ्यादरम्यान प्रकल्पासाठी तोडलेल्या झाडांचे ढीग बघून अतिशय वाईट वाटले. त्यावेळी जंगलाच्या अंतिम संस्काराला आल्याचा भास झाला. जंगलातील जुनी झाडे गुजरात्यासाठी कापली जात आहेत. या प्रकल्पाची काय गरज आहे, असा सवाल त्यांना उपस्थित केला. केंद्रातील सत्ताधारी आपल्या राज्यकर्त्यांना शून्य किंमत देत आहेत. राज्याचे सर्व निर्णय केंद्रातून घेतले जात आहेत. आणि अशा महाराष्ट्राचे वाटोळे करण्यासाठी आपणच त्यांना मदत करत आहोत. जाती-धर्म आणि पैशाच्या जोरावर राज्यकर्ते आपल्याला गुंडाळून घेतात. लाडक्या महिलांना दीड हजार रुपयात आमीश दाखवून त्यांचे तोड बंद करण्याचे काम हे करीत आहे. राज्यात •>पान ३ वर

५० खोक्यांचा हिशोब मांडला

राज ठाकरे यांनी राज्यातील सत्तांतरावरही थेट बोट ठेवले. ''५० खोके एकदम ओके'' असे सगळे बोलतात, पण त्याचा खरा अर्थ समजून घ्या. एका खोक्यात १ कोटी असतात, म्हणजेच एका आमदाराला ५० कोटी. अशा ४० आमदारांचे २ हजार कोटी रुपये होतात. हा एवढा अफाट पैसा आला कुठून? आणि हा पैसा कोणाच्या घशातून काढला जातोय? हे सगळे षड्यंत्र महाराष्ट्राने आता उघड्या डोळ्यांनी बघण्याची वेळ आली आहे, असा घणाघात राज ठाकरे यांनी केला.

सह्याद्रीवर कुऱ्हाडीचा घाव सहन करणार नाही

चित्रलेखा पाटील कडाडल्या

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

सह्याद्री हा केवळ डोंगरांचा प्रदेश नसून महाराष्ट्राचा नैसर्गिक वारसा आणि अस्मिता आहे. या सह्याद्रीवर कुऱ्हाड चालवून जंगलसंपत्ती उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असा ठाम निर्धार व्यक्त करत शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी टोरंट पॉवरच्या प्रस्तावित जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पासाठी होणाऱ्या वृक्षतोडीविरोधात आवाज बुलंद केला. कर्जत येथे आयोजित सभेत त्या बोलत होत्या.

भीमा शंकर परिसर हा रायगड जिल्ह्याची शान आहे. ॲमेझोन जसं जगाच श्वास मानले जाते, त्या पद्धतीने हा परिसर रायगड जिल्ह्याचा श्वास आहे. एका दिवसात हजारो झाडांची कत्तल प्रकल्पाच्या नावाखाली केली जाते, ही गंभीर बाब आहे. प्रकल्पाला विरोध नाही. मात्र, होणारी निसर्गाची हानी टाळण्यासाठी आंदोलन सुरू केले आहे. कर्जत परिसरातील टोरंट प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा मुद्दा सध्या ऐरणीवर आला आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड आणि वनक्षेत्राच्या वापराचा प्रश्न उपस्थित होत असून, त्याविरोधात पर्यावरणप्रेमी, स्थानिक नागरिक आणि विविध संघटना एकवटत आहेत.

याच पार्श्वभूमीवर चित्रलेखा पाटील यांनी सह्याद्रीच्या संरक्षणाची भूमिका ठामपणे मांडली. •>पान ३ वर



महाराष्ट्राचा लचका तोडण्याचा प्रकार सुरु

शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांची टीका

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

सह्याद्रीच्या घनदाट जंगलातील झाडांची तोड पाहून डोळ्यांतून पाणी येतं. जैवविविधतेचा अनमोल खजिना असलेला सह्याद्री नष्ट करून या परिसराचे मसनवट्यात रूपांतर करण्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्राचा लचका तोडण्याचा प्रकार सरकारकडून सुरू आहे, असा घणाघात शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी केला. पर्यावरणप्रेमी, जंगलप्रेमी आणि विविध समविचारी संघटना वृक्षतोडीविरोधात एकवटल्या असून, शेकाप त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

बाळाराम पाटील म्हणाले की, कोकणात पर्यावरणपूरक प्रकल्प आणावेत, अशी सातत्याने मागणी होत आहे. मात्र, स्थानिक पर्यावरण, वनसंपदा आणि जैवविविधतेचे संरक्षण करण्याऐवजी या भागात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होण्याची भीती निर्माण झाली आहे. सह्याद्रीचा परिसर हा वन्यजीव, विविध पक्षी आणि दुर्मीळ वनस्पतींचा समृद्ध अधिवास आहे. या नैसर्गिक संपत्तीचे जतन करून पर्यावरणपूरक पर्यटनाच्या माध्यमातून विकास साधता आला असता. मात्र, त्याऐवजी जंगल उद्ध्वस्त करणाऱ्या प्रकल्पांना प्राधान्य दिले जात आहे. प्रकल्पाच्या समर्थनार्थ रोजगारनिर्मितीचा मुद्दा मांडला जात असला, तरी प्रत्यक्षात स्थानिकांना किती रोजगार मिळणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याऐवजी बाहेरील राज्यांतील कामगारांना प्राधान्य मिळण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. विकासाच्या नावाखाली •>पान ३ वर

तळा तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ

तळा : तळा तालुक्यातील कुंबळे येथे बिबट्याने शेतकऱ्याच्या गोठ्यात बांधलेल्या गाईचा फडशा पाडल्याची थरारक घटना घडली आहे. या घटनेमुळे कुंबळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, शेतकऱ्यांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. कुंबळे येथील शेतकरी रविंद्र बालुगडे यांनी मंगळवारी (दि.२७) सायंकाळी आपली गुरे नेहमीप्रमाणे चरून आणून गावाबाहेर असलेल्या आपल्या वाड्यात बांधून ठेवली होती. बुधवारी (दि.२८) पहाटे ते गुरे सोडण्यासाठी •>पान २ वर

शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात भात उत्पादक शेतकऱ्यांना हवामान बदलाचा मोठा फटका बसला आहे. जिल्ह्यातील अलिबाग व मुरूड तालुक्यातील शेतकरीदेखील मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. अलिबाग, मुरूड व रोहा तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. तसा शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, अशी मागणी शेकाप अलिबाग तालुका शेतकरी सभेच्यावतीने करण्यात आली आहे. याबाब तालूका शेतकरी सभा अध्यक्ष अनिल गोमा पाटील यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि.२८) रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे आणि अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, सहचिटणीस नरेश म्हात्रे, शेकाप महिला आघाडी तालुका प्रमुख नागेश्वरी हेमाडे, मोहन धुमाळ, प्रमोद घासे, मुळेच्या सरपंच रोहिणी पाटील, अनंत पाटील, दिलीप गावंड, रवींद्र पाटील, महेश झावरे, रामदास शिंदे, नरेश गोंधळी, शैलेश पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला उपस्थित होते. •>पान २ वर



शेकाप तालुका शेतकरी सभेची मागणी

शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या आदेशानुसार तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांची भेट घेतली. यावेळी अलिबाग व मुरूड व रोहा तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. तालुक्यांतील नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई तातडीने देण्याची मागणीही केली आहे.

– अनिल गोमा पाटील, शेकाप अलिबाग तालुका शेतकरी सभा

जिल्हा परिषदेतील प्रशासकीय गैरव्यवहाराचा पर्दाफाश

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेतील एका मोठ्या प्रशासकीय गैरव्यवहाराचा पर्दाफाश झाला असून, शासकीय आदेशांना केराची टोपली दाखवून तब्बल ४५ कर्मचारी वर्षानुवर्षे प्रतिनियुक्तीवर ठाण मांडून बसल्याचे समोर आले आहे. या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणारे संबंधित खातेप्रमुख आणि वर्षानुवर्षे मूळ पदस्थापनेवर न जाता मलाईदार टेबल अडवून बसलेल्या कर्मचाऱ्यांच्या बेकायदेशीर आर्थिक लागेबांध्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी लेखी तक्रार संजय सावंत यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

- खातेप्रमुखांना कर्मचारी हप्ते देत असल्याचा आरोप
- थेट मुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी



माहिती अधिकार व अधिकृत दस्तऐवजांच्या आधारे समोर आलेल्या माहितीनुसार, रायगड जिल्हा परिषदेतील विविध संवर्गातील तब्बल ४५ कर्मचारी मूळ पदस्थापनेवर काम न करता मंत्रालय, कोकण भवन (विभागीय आयुक्त कार्यालय) आणि जिल्हा परिषद मुख्यालयातील सोयीच्या मलाईदार जागांवर वर्षानुवर्षे कार्यरत आहेत. ग्रामपंचायत, ग्रामीण पाणी पुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि बांधकाम यांसारख्या अत्यंत संवेदनशील •>पान २ वर

चौथ्या मजल्यावरून पडून मृत्यू

पनवेल : तालुक्यातील उमरोली येथील हेरंब रेसिडेन्सी इमारतीत चौथ्या मजल्यावर स्लॅबचे काम करताना खाली पडून कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. मोहम्मद अकबर कलामुद्दीन मिया आलम असे मृत कामगाराचे नाव आहे. बांधकामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध नसल्याच्या आरोपावरून पनवेल तालुका पोलिसांनी हेरंब रेसिडेन्सी, श्री सिद्धिविनायक बिल्डर्स आणि बांधकाम ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाडच्या बिअर बारमध्ये राडा

सोड्याच्या बाटलीने डोक्यावर वार; दोघांत हाणामारी

। महाड । प्रतिनिधी ।

महाड शहरातील अप्सरा बिअर बारमध्ये मद्य पिताना झालेल्या वादातून एका व्यक्तीच्या डोक्यात सोड्याची काचेची बाटली फोडून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी विक्रांत गोवर्धन उर्फ पप्पू महाडिक याच्याविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.२७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास कृष्णा बहादुर महेंद्रसिंग हा आपल्या मित्रासोबत अप्सरा बिअर बारमध्ये मद्य पिण्यास बसला होता. यावेळी झालेल्या शिवीगाळीतून वाद निर्माण झाला. या वादाचा राग मनात धरून विक्रांत गोवर्धनने बाजूच्या टेबलवरील सोड्याची काचेची बाटली कृष्णा महेंद्रसिंगच्या डोक्यात मारली. त्यानंतर बिअर बारखालील टपरीवरही कृष्णा महेंद्रसिंग याच्या डोक्यात पुन्हा काचेची बाटली मारल्याचे तक्रारीत नमूद आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या फिर्यादीला उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरडग्रस्त गावातील निवाराशेडचा सावळागोंधळ

पोलादपूर तालुक्यातील शेतकरी मोबदल्यापासून वंचितच

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर तालुक्यातील १९ दरडग्रस्त गावांतील निवारा शेडबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राष्ट्रीय विकास महामंडळ यांनी ठेकेदारांच्या बांधकामाचा, तर जिल्हाधिकारी यांनी खासगी जमीनमालक शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचा मोबदल्याचा अद्याप मंजुरीसाठी विचार केलेला नाही. मार्चमध्ये या निवारा शेडचा ताबा सरकारला द्यायचा असताना अद्याप सर्व निवारा शेड अपूर्णावस्थेत आहे.

पोलादपूर तालुक्यात दि.२२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमध्ये येथील केवनाळे व साखर सुतारवाडी या गावांत दरडी कोसळून मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली होती. त्यानंतर २०२२ साली पोलादपूर तालुक्यातील दरडप्रवण गावांचे भारतीय भूवैज्ञानीक •>पान २ वर



• (छायाचित्र: शैलेश पालकर)

गिरवलेत गॅसचा काळाबाजार उघड

१० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

। पनवेल । प्रतिनिधी ।

घरगुती गॅस सिलिंडरमधील गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून त्याची काळ्या बाजारात विक्री करण्याचा कथित प्रकार पनवेल तालुक्यातील गिरवले येथे उघडकीस आला आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या राज्यस्तरीय दक्षता पथकाने धाड टाकून १३६ गॅस सिलिंडर, गॅस भरण्याची उपकरणे आणि वाहनांसह सुमारे १० लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शासकीय परवानगीशिवाय गॅस सिलिंडरचा साठा करून, विद्युत जोडणी असलेल्या उच्चदाब पंपाच्या साहाय्याने घरगुती सिलिंडरमधील गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरला जात असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्यानुसार छापा टाकून हा प्रकार उघडकीस आणण्यात आला. कारवाईत १३६ भरलेले व रिकामे सिलिंडर, दोन इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, दोन साधे वजनकाटे, गॅस भरण्याचे उपकरण, विविध कंपन्यांचे •>पान २ वर

मिनीट्रेन तब्बल १५ दिवस उशिराने सुरू | दिवाळी पर्यटन आकर्षण ठरणार

माथेरानची राणी शुक्रवारपासून रुळावर

। नेरळ । प्रतिनिधी ।

जगभरातील पर्यटकांची लाडकी मिनीट्रेन दि.१५ जून ते १५ ऑक्टोबर या कालावधीत पावसाळी सुट्टीवर जात असते. मात्र, यावर्षी मिनीट्रेनची प्रवासी वाहतूक तब्बल १५ दिवस उशिरा सुरू होणार असून, शुक्रवार दि.३० ऑक्टोबरपासून पुन्हा एकदा नॅरोगेज रुळावर येणार आहे. दरम्यान, यंदा दिवाळी सुरू होण्याआधी मिनीट्रेनची प्रवासी वाहतूक सुरू होत असल्याने माथेरानमधील व्यवसाय आणि पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.


१९०७ मध्ये ब्रिटिश काळात नेरळ जंक्शन स्थानकातून माथेरानसाठी मिनीट्रेन सुरू झाली. २१ किलोमीटर अंतरावर नॅरोगेज मार्गावर चालणारी मिनीट्रेन नेहमीप्रमाणे १५ जूनपासून पावसाळी सुट्टीवर गेलो होती; मात्र, नेहमीप्रमाणे दि.१५ ऑक्टोबर रोजी सुरू होणारी प्रवासी वाहतूक यावर्षी अद्याप सुरू झालेली नाही. यावर्षी १५ सप्टेंबरपासून पाऊस झालेला नाही आणि त्यामुळे •>पान २ वर

नवीन गाड्यांची घोषणा नाही

यंदा मनीट्रेनच्या प्रवासी फेऱ्यांमध्ये कोणतीही वाढ होण्याची आशा मावळली आहे. गेल्या दोन वर्षांपासून नेरळ-माथेरान मार्गावर केवळ दोनच प्रवासी गाड्या चालवल्या जात आहेत. त्यात वाढ करण्याची अनेक वर्षांची मागणी मध्य रेल्वेकडून मान्य केली जात नाही.

इंजिनाची दुरुस्ती रखडली

नेरळ येथील लोको कार्यशाळामध्ये एकूण आठ डिझेल इंजिन असून, त्यातील तीन इंजिन नादुरुस्त अवस्थेत होती. तर पाच इंजिनाची दुरुस्ती उशिरा झाल्याने यंदा १५ ऑक्टोबर रोजी मिनी ट्रेनची नेरळ-माथेरान प्रवासी वाहतूक सुरू करता आली नाही.



पुणे पदवीधरमधून हर्षदा देशमुख विजयी

- शेकापसह मविआच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष
- भाजपच्या स्मिता जाधव यांचा पराभव

। पुणे । प्रतिनिधी ।

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार हर्षदा देशमुख-जाधव यांनी विजय मिळवला आहे. पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये विजयासाठी आवश्यक कोटा पूर्ण करता न आल्याने दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी करण्यात आली. या मतमोजणीत हर्षदा देशमुख यांनी भाजपच्या उमेदवार स्मिता जाधव यांचा पराभव केला. या निकालामुळे पुणे पदवीधर मतदारसंघात दुसऱ्या पसंतीच्या मतांनी निर्णायक भूमिका बजावल्याचे स्पष्ट झाले.



पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांची निवडणुक मतमोजणी पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात सुरू होती. दोन दिवस चाललेली मतमोजणी बुधवारी पूर्ण झाली. पुणे पदवीधर मतदारसंघात एकूण २ लाख २६ हजार २२४ वैध मते नोंदवण्यात आली. पहिल्या पसंतीच्या मतांद्वारे विजयासाठी १ लाख १३ हजार ११३ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला होता. पहिल्या पसंतीच्या मतमोजणीत हर्षदा देशमुख यांना १ लाख ११ हजार २७९, तर भाजपच्या स्मिता जाधव यांना १ लाख २ हजार ४२७ मते मिळाली. मात्र, हर्षदा देशमुख यांना विजयासाठी आवश्यक कोटा पूर्ण करता न आल्याने दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी करण्यात आली. •>पान २ वर

दिवाळीच्या फराळाला महागाईचा तडका

■ महिला बचत गटांची लगबग सुरू ■ नोकरी करणाऱ्या महिलांचा तयार फराळाकडे कल

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

दिवाळीचा सण जवळ येऊ लागल्याने घराघरांत फराळाच्या तयारीची लगबग सुरू झाली आहे. दिवाळीच्या फराळातील चकलीचा कुरकुरीतपणा, लाडवांचा गोडवा, चिवड्याचा खमंगपणा आणि करंजीची चव यामुळे सणाचा आनंद द्विगुणित होतो. मात्र, नोकरी, घर आणि मुलांची जबाबदारी सांभाळताना महिलांना पारंपरिक फराळ बनवण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याने तयार फराळ खरेदी करण्याकडे त्यांचा कल वाढत आहे.

पनवेल परिसरात दिवाळीच्या फराळासाठी महिला बचत गटांनी तयारी सुरू केली आहे. त्यात पनवेल येथील तारा बचत गट सध्या फराळाचे विविध पदार्थ बनवण्यात व्यस्त आहे.



दिवाळीच्या काळात घरगुती चवीचा, ताज्या फराळाचा आस्वाद घेण्यासाठी ग्राहकांकडून आगाऊ ऑर्डर देण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे महिला बचत गटांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे.

दिवाळीचा फराळ बनवणे हे एकट्या व्यक्तीचे काम नाही. भाजणी तयार करणे, पीठ मळणे, चकल्या पाडणे, तळणे, लाडू वळणे, करंज्या भरणे आणि पदार्थ व्यवस्थित पॅक करणे, अशी अनेक कामे एकाच वेळी करावी लागतात. त्यामुळे महिला एकत्र येऊन फराळ तयार करताना कामाची विभागणी करतात. यातून पदार्थांची गुणवत्ता राखण्यासोबतच वेळेचे नियोजनही करता येते. तारा बचत गटाकडून विशेषतः भाजणीच्या चकलीला महत्त्व दिले जाते. योग्य प्रमाणात भाजलेली डाळी-कडधान्ये, मसाल्यांचा वापर आणि चकलीला मिळणारा कुरकुरीतपणा यामुळे भाजणीच्या चकलीला फराळात विशेष स्थान आहे.

चकलीसोबतच लाडू, शंकरपाळी, चिवडा आणि करंज्या यांसारखे पारंपरिक पदार्थ बनवण्याची तयारीही सुरू आहे.

फराळाचे अंदाजे दर (प्रतिकिलो)

भाजणीची चकली : ६५० ते ७००
चिवडा : ५५० ते ६००
शंकरपाळी : ५०० ते ५५०
बेसनाचे लाडू : ६५० ते ७५०
रव्याचे लाडू : ६०० ते ७००
करंज्या : ६५० ते ७५०

बचत गटांना रोजगाराची संधी

तयार फराळाच्या वाढत्या मागणीमुळे महिला बचत गटांना आर्थिक उत्पन्न मिळवण्याची संधी निर्माण झाली आहे. घरगुती चवीचे पदार्थ तयार करून ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याबरोबरच महिलांना एकत्रितपणे काम करण्याची संधीही मिळते. दिवाळीच्या काळात मिळणाऱ्या ऑर्डरमुळे बचत गटांच्या कामाला गती येते.

कच्च्या मालाच्या दरवाढीचा परिणाम

यंदा फराळ बनवण्यासाठी लागणारे खाद्यतेल, डाळी, साखर, रवा, बेसन, सुकामेवा आणि इतर साहित्य यांच्या किमती वाढल्याने फराळाच्या खर्चातही वाढ होत आहे. परिणामी तयार फराळाच्या किमतींवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. ग्राहकांना चव, गुणवत्ता आणि बजेट यांचा मेळ साधावा लागत आहे.

पाणीटंचाई रोखण्यासाठी भूजल सर्वेक्षणाची मागणी

पनवेल : संभाव्य तीव्र पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमध्ये विहिरी, बोअरवेल आणि अन्य भूजल स्रोतांचे सर्वेक्षण करावे. तसेच पाण्याची गुणवत्ता तपासून भूजल पुनर्भरण, आवश्यकतेनुसार नवीन सार्वजनिक बोअरवेल आणि आपत्कालीन पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, अशी मागणी नगरसेवक राजेंद्र शर्मा यांनी केली आहे.

दिनांक : २९ ऑक्टोबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे - गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे. आर. पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
अंकुश काळुराम पाटील	२४	६	०-१९-०	०	१२

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :- २९/१०/२०२६

पी.एन.पी. होली चाईल्ड शाळेत 'फादर्स डे' साजरा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पी.एन.पी. होली चाईल्ड इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये फादर्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग घेत 'फादर्स डे' चा आनंद लुटला.

शाळेच्या प्रांगणात आयोजित या विशेष कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, उपमुख्याध्यापिका शर्मिला



शेट्टे, राजश्री पाटील, समिता मालोदे, शारदा परदेशी, सायमा उल्डे, उदय पाटील यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या वडिलांसाठी खास गाणी, नृत्य आणि भाषणे सादर केली. काही विद्यार्थ्यांनी वडिलांसाठी स्वतः बनवलेली शुभेच्छा पत्रे देऊन त्यांच्याबद्दलचा आदर व्यक्त केला. तसेच, शाळेच्यावतीने वडिलांसाठी विविध मजेदार खेळ आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व खेळांमध्ये वडिलांनी लहान मुलांसारखा आनंद घेत सहभाग घेतला, त्यामुळे संपूर्ण वातावरण हसऱ्या-खेळकर झाले होते. या स्पर्धाचे परीक्षण केतन पाटील आणि वृषाली घरत यांनी केले. वडील आणि मुलामधील नाते अधिक घट्ट व्हावे, वडिलांच्या त्यागाची जाणीव मुलांना व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे मुख्याध्यापीका निसर्गा चेवले यांनी सांगितले.

आजच्या धावपळीच्या जीवनात वडिलांना मुलांसोबत वेळ घालवता येत नाही, अशा कार्यक्रमांमुळे आम्हाला मुलांसोबत एक दिवस मजा करता आली, अशी प्रतिक्रिया प्रणय पाटील या पालकाने व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व वडिलांचे आभार मानून त्यांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

माणगावजवळ दुचाकीचा अपघात

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगावमधील मुंबई-गोवा महामार्गावरील आडघर फाटा हॉटेल येथे मंगळवारी (दि.२७) कार आणि दुचाकीमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात शिवसेना श्रीवर्धन तालुका संपर्कप्रमुख जनार्दन गोवारी यांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळच्या सुमारास जनार्दन गोवारी (५५) हे मुंबई-गोवा महामार्गावरील आडघर फाटा येथून मुंबईच्या बाजूकडे जात होते. त्याचवेळी त्यांच्या मागून येणाऱ्या कारने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात जनार्दन गोवारी



यांचा मृत्यू झाला. याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात कार चालक महेश सुर्वे (३८) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास माणगाव पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई तळेकर करीत आहेत.

पान १ वरुन

जिल्हा परिषदेतील प्रशासकीय गैरव्यवहाराचा पर्दाफाश

विभागांतील कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती रद्द करण्याचे वा मुदत संपल्याचे स्पष्ट आदेश असतानाही, त्यांना कार्यमुक्त केले नाही, अशी अधिकृत नोंद अभिलेखावर दिसून येत आहे. अनेक कर्मचारी २०११, २०१५, २०१६ आणि २०१८ पासून प्रतिनियुक्तीच्या नावाखाली मूळ कार्यक्षेत्र सोडून सोयीच्या जागी तळ ठोकून आहेत. शासकीय नियमानुसार प्रतिनियुक्तीचा कार्यकाळ मर्यादित असतो. ग्रामीण भागात कर्मचाऱ्यांअभावी जनतेची कामे ठप्प असताना, या कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त न करण्यासाठी वरिष्ठ अधिकारी व खातेप्रमुखांना दरमहा नियमित आर्थिक लाभ (हप्ते/कट कमिशन) पोहोचवले जात असल्याचा थेट आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. मूळ आस्थापनेवर कर्मचाऱ्यांचा तुटवडा दाखवायचा आणि स्वतःच्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना मुख्यालयात बेकायदेशीरपणे ठेवून टक्केवारी गोळा करायची, असा हा गंभीर प्रशासकीय गैरव्यवहार सुरू असल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे. यावेळी संजय सावंत यांनी, मुख्यमंत्र्यांकडे आदेश असतानाही कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त न करणाऱ्या संबंधित सर्व खातेप्रमुख आणि आस्थापना अधिकाऱ्यांवर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी तात्काळ निलंबनाची कारवाई करावी. बेकायदेशीर प्रतिनियुक्तीवर ठाण मांडून बसलेले कर्मचारी आणि त्यांना पाठीशी घालणारे खातेप्रमुख यांच्या बँक खात्यांची, तसेच स्थावर व जंगम मालमत्तेची आणि इडीच्या धर्तीवर खुली चौकशी करण्यात यावी. प्रतिनियुक्तीवरील सर्व ४५ कर्मचाऱ्यांना २४ तासांच्या आत कार्यमुक्त करून मूळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्याचे कठोर आदेश द्यावेत. शासनाच्या झिरो टॉलरन्स धोरणानुसार या भ्रष्ट साखळीवर तातडीने कठोर फौजदारी कारवाई करावी, अशा मागण्या केल्या आहेत. अन्यथा या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा संजय सावंत यांनी दिला आहे. या तक्रारीमुळे रायगड जिल्हा परिषदेसह मंत्रालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या

यंदा पाऊस उशिरा पडला. त्यानंतर पावसाने लवकरच दडी मारली. त्याचा परिणाम जिल्ह्यातील भात पिकांवर मोठ्या प्रमाणात झाला आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातही मोठ्या प्रमाणात भातपीक लागवड केली जाते. शासनाने यावर्षी दुष्काळग्रस्त तालुके जाहीर केले. परंतु, रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड व रोहा या तालुक्यांचा यामध्ये समावेश करण्यात आला नाही. त्यामुळे या तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याबाबत शेकाप अलिबाग तालुका शेतकरी सभेने बुधवारी जिल्हा प्रशासनासह तालुका प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यांना दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात यावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेली ५ हजार रुपयांची अग्रीम मदत तातडीने देण्यात यावी. भातशेतीच्या नुकसानीचे पंचनामे तालुक्यातील प्रत्येक सजाप्रमाणे तातडीने करण्याचे संबंधितांना आदेश देण्यात यावेत. पिण्याच्या पाण्याचे नियोजन प्रत्येक ग्रामपंचायतीप्रमाणे करून आवश्यकतेनुसार, टँकर उपलब्ध करण्यात यावेत, अशा अनेक मागण्या शेकापच्यावतीने करण्यात आल्या.

गिरवलेत गॅसचा काळाबाजार उघड

सुमारे १५० स्टिकर्स आणि अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो जप्त करण्यात आला. या प्रकारामुळे गॅसची अनधिकृत साठवणूक आणि पुनर्भरणाच्या व्यवहारांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा पद्धतीने गॅस हाताळल्यास सुरक्षिततेचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत मेटे यांनी गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

पतीला पळवून नेल्याने खळबळ

प्रथमच समोर येत असल्याने पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश दत्तात्रय वालेकर (३२) असे पीडित पतीचे नाव आहे. ते दि.२० ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास घरा बाहेर गेले असताना त्यांना कोणीतरी पळवून नेल्याची तक्रार पत्नीने कोलाड पोलीस ठाण्यात केली आहे. अधिकारी भरत फारणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एस.बी. मेरगळ अधिक तपास करीत आहेत.

माथेरानची राणी शुक्रवारपासून रूळावर

मिनीट्रेनचा मार्ग सुस्थितीत आहे. परंतु, मध्य रेल्वेकडून या मार्गावरील वाहतुकीत काही बदल करण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्यामुळे नेरळ-माथेरान मार्गावर प्रवासी सेवा सुरू होण्यात चालढकल सुरू असल्याची माहिती पुढे आली आहे. युनोस्को वर्ल्ड हेरिटेज ट्रेनमध्ये समाविष्ट असल्याने मिनीट्रेन आणखी आकर्षक बनवण्यात भर देण्यात येत आहे. दरम्यान, यावर्षी दि.१५ ऑक्टोबर रोजी नेरळ-माथेरान मनीट्रेनची प्रवासी वाहतूक सुरू झाली नसल्याने नाराजी व्यक्त केली जात होती. आता मात्र नेरळ-माथेरान या मार्गावरील पर्यटकांची आवडती टॉय ट्रेन सेवा शुक्रवार दि.३० नोव्हेंबरपासून पूर्ववत होत असल्याची माहिती मध्यरेल्वे कडून जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार नेरळ येथून दररोज सकाळी माथेरानसाठी दोन तर माथेरानवरून नेरळसाठी दुपारी दोन प्रवासी गाड्या सोडण्यात येणार आहेत. नेरळ येथून पहिली प्रवासी गाडी सकाळी ८.५० वाजता, तर दुसरी प्रवासी गाडी १०.२५ वाजता माथेरानसाठी रवाना होणार आहे.

दरडग्रस्त गावातील निवाराशेडचा सावळागोंधळ

विभाग शाखा पुणे (जीएसआय) यांच्याकडून सर्वेक्षण झाले. या सर्व्हेक्षणानुसार वर्ग १ करिता २ गावे, वर्ग २ करिता ४ गावे, वर्ग ३ करिता २० गावे व वर्ग ४ मध्ये ११ गावांपैकी एकूण ३ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग पोलादपूरकडून कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत माटवण जुवले मोहल्ला व सवाद माटवण, दाभिळ (हळदुले), साखर पेढेवाडी व चव्हाणवाडी, मोरसडे आडाचाकोंड, कामथे व फौजदारवाडी, दाभिळ (हळदुले बौद्धविहार), कातळी कामतवाडी, पेढेवाडी किनेश्वर गावठाण, किनेश्वर (शिववाडी पेठेवाडी किनेश्वर), कुडपण बुद्रुक, ओंबळी आणि नानेघोळ गावठाण कदमवाडी बाबरवाडी या १२ ठिकाणी निवारा शेड बांधण्याकरिता २० कोटी २५ लाख ७८ हजार ९७८ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच, भूवैज्ञानिक शिफारसीनुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधावयाच्या ७ निवारा शेड धामणदिवी, ढवळे, कुडपण खुर्द, कोंढवी, कोतवाल बुद्रुक, सवाद आणि हावरे येथे बांधण्यासाठी ८ कोटींहून अधिक निधीला मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी धामणदिवी आणि हावरे येथील खासगी जमिनीवर निवारा शेड बांधण्यात येत आहेत. यापैकी एका निवारा शेडच्या जमिनमालकाने प्रकरण न्यायप्रविष्ट केले असल्याची माहिती मिळाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील निवारा शेडसाठी संपत मनवे व इतरांची ३ गुंठे जमीन, बाळकृष्ण उतेकर यांची ३ गुंठे जमीन, तर ज्ञानदेव गोगावले, तुकाराम उतेकर, तानाजी पवार, महेश चिकनचे, हनवती चोरगे आणि चंद्रकांत कदम यांची प्रत्येकी ५ गुंठे जमीन महसूल विभागामार्फत कोणतेही मुद्रांक शुल्क न भरता अथवा कोर्टफी स्टँपदेखील न लावलेल्या साध्या छापील संमतीपत्रावर सही घेऊन निवारा शेड बांधण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र, आजमितीस कोणत्याही शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांनी लेखी अर्ज व निवेदने देऊनही महाड उपविभागीय अधिकारी आणि रायगड जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे भूसंपादनाच्या मोबदल्याचा विषय असल्याचा अंगुलीनिर्देश करून सपशेल दुर्लक्ष केले जात आहे. तसेच, ठेकेदारांना केलेल्या कामाचा मोबदला रखडल्याने उर्वरित सरकारी जमिनीवर निवारा शेडचे बांधकाम कासवगतीने सुरू आहे. त्यामुळे पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त वाड्या व गावांऐवजी अन्य वाडी अथवा गावात काही निवारा शेड बांधण्यास सुरुवात झाली असून, नैसर्गिक आपत्तीच्या काळात दरडग्रस्त भागातील लोकांना फार दूरच्या निवारा शेडचा आश्रय घ्यावा लागणार आहे. १९ निवारा शेडपैकी साखर येथील निवारा शेडच्या बांधकामासाठी पहिल्या बिलाची रक्कम देण्यात आली आहे. तर, तालुक्यातील काही निवारा शेडसंदर्भातही शासनाकडून पहिल्या बिलाची रक्कम संबंधित ठेकेदारांना अदा करण्यात येऊनही कामाची प्रगती १० ते ३५ टक्क्यांपर्यंत असल्याने यंदाच्या मार्चमध्ये सर्व निवारा शेड शासनाकडे वर्ग झाल्या नसल्याने आगामी पावसाळ्यापूर्वी वर्ग होण्याची शक्यता दिसून येत नाही. अतिवृष्टी काळात दरडप्रवण क्षेत्रातील ग्रामस्थांना किती अंतरावर सुरक्षित स्थळी स्थलांतरण करावे, याबद्दल आपत्ती व्यवस्थापनाचा कोणताही निकष नसल्याने दरडग्रस्त गावातील १९ निवाराशेडचा सावळागोंधळ अधिकच वाढला आहे.

तळा तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ

वाड्यात गेले असता त्यांना गाईवर बिबट्याने हल्ला करून तिला ठार केल्याचे भयानक दृश्य दिसले. या घटनेची माहिती तात्काळ वन विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यानंतर वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली, पंचनामा केला आणि नुकसान भरपाई मिळावी यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवला. दरम्यान, ही पहिलीच घटना नसून, याआधी देखील ताम्हणे आणि गणेशनगर परिसरात रात्रीच्या वेळी नागरिकांना बिबट्या दिसला होता. तर, जंगलात एक वासरू मृतावस्थेत आढळले होते. मात्र, आता थेट गावालगतच्या गोट्यात बांधलेल्या गाईवर हल्ला झाल्याने बिबट्याची दहशत वाढली असून, गावातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पुणे पदवीधरमधून हर्षदा देशमुख विजयी

या मोजणीनंतर हर्षदा देशमुख यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले. पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून भाजपचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांनी विजय मिळवला. शिक्षक मतदारसंघात ८५.८६ टक्के, तर पदवीधर मतदारसंघात ६२.७६ टक्के मतदान झाले होते. मतमोजणीदरम्यान शिक्षक मतदारसंघातील १ हजार ६७३, तर पदवीधर मतदारसंघातील सुमारे १७ हजार मते अवैध ठरली. त्यानंतर शेकापसह महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

मराठवाड्यात डॉ. प्रतापसिंह पाटील यांची बाजी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी विजय मिळवला आहे. महायुतीचे उमेदवार आणि विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांचा पराभव करून त्यांनी या मतदारसंघात बाजी मारली. सलग तीन वेळा या मतदारसंघातून निवडून आलेल्या सतीश चव्हाण यांना यंदा पराभवाचा सामना करावा लागला. मतमोजणीत सुरुवातीपासूनच डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी आघाडी कायम ठेवली होती. पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये त्यांना ७३ हजार ९३१ मते मिळाली, तर सतीश चव्हाण यांना ६० हजार ७६८ मते मिळाली. अपक्ष उमेदवार रविराज ऊर्फ अण्णासाहेब सावळे-पाटील यांना १९ हजार ८३५, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार दिलीप घुगे यांना ८ हजार ४३९ मते मिळाली. तिसऱ्या फेरीअखेर डॉ.

सिडको
शहरांचे शिल्पकार

(शुद्धिपत्रक)

नवी मुंबई प्रकल्पांकरिता संपादित जमिनीपोटी श्री. मोतीराम धर्मा पालकर व इतर यांना वाटपित भूखंडाचे त्रिपक्षीय करारनामा मे. हेजल आणि नाव्या इंफ्रा एलएलपी तर्फे भागीदार १) विजय भवानजी पटेल २) दिनानाथ एस. मिश्रा यांच्या सोबत त्रिपक्षीय करारनामा निष्पादित करणेबाबत जाहीर सूचना दि. २९/०७/२०२६ रोजी "रामप्रहर" व "कृषीवल" या दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर सूचनेमध्ये श्री. जयराम गोपाळ वनगा असे नाव नमूद आहे. तरी या शुद्धीपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, श्री. जयराम गोपाळ वनगा यांच्याऐवजी **श्री. मोतीराम धर्मा पालकर व इतर** असे वाचण्यात यावे.

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१६३(अ)/२०२६-२७

सिडको
शहरांचे शिल्पकार

नोटीस-१

साडेबावीस टक्के विकसीत भूखंड वाटप योजनेअंतर्गत भूखंडाचे हस्तांतरण करण्यास "ना हरकत प्रमाणपत्र" मागणी अर्जानुसार नोटीस श्रीमती. लता अशोक जगताप, राहणार- शाळे समोर, ता. पुरंदर, नाथेवाडी, सासवड, पुणे, महाराष्ट्र-४१२ ३०१, (अर्जदार).

ज्याअर्थी अर्जदार श्रीमती. लता अशोक जगताप यांना २२.५% योजनेअंतर्गत खालील तक्त्यात नमूद त्यांना वाटपीत करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. अस्टेल एपेक्स रिअल्टी एलएलपी** तर्फे भागीदार **१)** स्कायरोस इन्फ्रा एलएलपी तर्फे भागीदार अ) करण नरेश शाह ब) व्दिजेन विपूल शाह क) देवेंद्र कुमार धरमचंद जैन **२)** मे. अस्टेल डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार अ) महेंद्र घासीलाल राठोर ब) रमेश चिन्नया बंगेरा क) आनंद अशोकभाई दोशी यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

हस्तांतरण अर्ज क्रमांक	अर्जाचा दिनांक	हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील				वाटप दिनांक	भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक
		नोड	सेक्टर	भूखंड क्रमांक	क्षेत्र (चौ.मी.)		
४२४७	१८/०८/२०२६	पुष्पक नोड	२६	३९४	११९०.०० चौ.मी.	१९/०१/२०२३	२७/१२/२०२४ २४/०१/२०२५

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२७५/२०२६-२७

सार्वजनिक सूचना

सूचना सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की आमच्या ग्राहकांनी, शेतजमीन/बिन-शेतजमीन मिळकतीचे खालील रकान्यामध्ये नमूद मालक यांच्याकडून शेतजमीन मिळकती खरेदी करण्यास सहमती दर्शविली आहे.

मालमत्तेचे वर्णन

मौजे तुपगाव ता खालापूर. जि.रायगड

सर्व्हे/हिस्सा क्रमांक	मालक	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	प्रकार	आकार (रु.पै.)
१५०/१	क्लॅरिजेस सेझ प्रायव्हेट लि.	०१-४३-४०	बिन-शेतजमीन	१४३४
१५०/२/B	कॅप्टन अवतेजिंदर सिंग मान	००-८०-००	बिन-शेतजमीन	८००
१५०/३/B	कॅप्टन अवतेजिंदर सिंग मान	००-३०-००	बिन-शेतजमीन	३००
१५१	कॅप्टन अवतेजिंदर सिंग मान	००-६९-००	बिन-शेतजमीन	६९०
१५२/१	पूजा नंदा प्रिया नंदा मोना नंदा पायल सखूजा	००-०८-१०	शेतजमीन	०.०८
१५२/२/A	अवतेजिंदर सिंग मान	००-२०-१०	शेतजमीन	०.४१
१७९/२	कॅप्टन अवतेजिंदर सिंग मान	००-४६-५०	शेतजमीन	०.५५
	एकूण बिन - शेतजमीन -०३-२२-४० (हे आर चौ.मी.) (i.e ३२२.४० गुंठा) एकूण शेतजमीन - ००-७४-७० (हे आर-चौ.मी.) (i.e ७४.७० गुंठा)			

कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद केलेल्या शेतजमीन विक्री, विनिमय, तारण, भार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, हक्क, परवाना, हायपोथिकेशन, मालकी हक्काचा हस्तांतरण, कोणत्याही ट्रस्टखालील लाभदायी हक्क, प्रिएम्शन हक्क, प्रथम खरेदी हक्क, करार, डिक्री, आदेश, निर्णय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा, आक्षेप, स्वास्थ्य किंवा वाद असल्यास त्यांनी त्यांचे दावे/आक्षेप/वाद याबाबतची कागदपत्रे सादर करून या सूचनेच्या प्रकाशनापासून एकवीस (२१) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्याशी संपर्क साधावा. अन्यथा आमचे क्लायंट वरील मालकाशी विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि नंतर कोणताही तृतीय पक्षाचा दावा/आक्षेप/वाद विचारात घेतला जाणार नाही.

श्री. विशाल सिंह
M/S VR LEGAL & Co.
कार्यालय क्र.२२५. थापर कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.५१. सेक्टर १५ सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
संपर्क: +९१-९९२०३९०९५९
ईमेल आयडी : adv.vrlegal@gmail.com

पान १ वरुन

सह्याद्रीवर कुऱ्हाडीचा घाव सहन करणार नाही

सह्याद्रीवर कुऱ्हाडीचा घाव घालून येथील झाडे तोडण्याचे काम केले जात आहे. सह्याद्रीवर कुऱ्हाडीचा घाव घालत असाल तर ते कदापी सहन केले जाणार नाही, असा इशारा शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला. यापुढे मार्गदर्शन करताना चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, हा लढा सोपा नाही. हा लढा स्मार्ट मीटरला जोडणारा आहे. महाग वीज विकून त्याची वसूली सर्वसामान्यांकडून करण्याचा घाट घातला आहे. त्यामुळे कर्जतसह जिल्ह्यातील नागरिकांना जागृत राहण्याची गरज आहे. भीमाशंकर परिसर, डोंगर भाग निसर्गाच्या सानिध्यात आहे. या सह्याद्रीवर कुऱ्हाडीचा घाव घालून येथील झाडे तोडण्याचे काम केले जात आहे. कोणत्याही प्रकारची निविदा न काढता, परस्पर या ठिकाणी प्रकल्प आणण्याचा घाट सुरु आहे. रायगड जिल्ह्यात शेकाप आणि समविचार पक्षाची एक वेगळी भूमिका आहे. वृक्षतोड करून जर टोरंट सारखे प्रकल्प येणार असतील तर असे प्रकल्प हाटविल्याशिवाय राहणार नाही. निसर्ग नष्ट करण्याचे काम हे सरकार करीत आहे. शेतकरी कामगार पक्ष हे कदापी सहन करणार नाही. कार्पोरेट खोती होऊ देणार नाही. आम्ही सत्तेत नसलो तरी या भागातील वनसंपदा वाचविण्यासाठी आणि येथील नागरिकांच्या सुरक्षेसाठी तीव्र लढा देण्याची क्षमता आमच्यात आहे. हवा, पाणी हा सर्वसामान्यांचा मुलभूत हक्क आहे. विकासाच्या नावाखाली होणारी लुट थांबविण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष येथील झाडांच्या व नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. अठरा दिवसात या प्रकल्पासाठी मंजूरी देण्याचे काम केले जाते. मात्र, येथील स्थानिकांना रस्ता, घरे बांधण्याची परवानगी देण्यासाठी वर्षानुवर्षे फेऱ्या मारण्यास लावल्या जातात, ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे सरकारने वेठीस धरून हा प्रकल्प जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न केला तर शेकाप स्टाईलने उत्तर देऊ, असा इशारा शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला.

महाराष्ट्राचा लचका तोडण्याचा प्रकार सुरु

नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होत असेल, तर अशा विकासाच्या दिशेचा पुनर्विचार करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या परिसरात घनदाट जंगल असून, मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्यास वन्यप्राणी, पक्षी आणि संपूर्ण परिसंस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. जंगलावर अवलंबून असलेल्या स्थानिकांच्या जीवनमानावरही त्याचे परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वृक्षतोडीचा प्रश्न केवळ झाडांपुरता मर्यादित नसून, तो पर्यावरण, जैवविविधता आणि मानवी अस्तित्वाशी संबंधित असल्याचे बाळाराम पाटील यांनी स्पष्ट केले.

वृक्षतोडीविरोधात शेकाप ठाम

या वृक्षतोडीविरोधात शेकापसह विविध समविचारी पक्ष, पक्षीप्रेमी, जंगलप्रेमी आणि पर्यावरणप्रेमी एकत्र आले आहेत. रायगड जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून पर्यावरणप्रेमी या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पुढे येत आहेत. आगामी काळात झाडांची तोड होऊ नये, ही आमची ठाम भूमिका आहे. सह्याद्रीचे जंगल आणि येथील जैवविविधता वाचवण्यासाठी शेकाप सक्रिय भूमिका बजावेल. पर्यावरणाच्या रक्षणासाठी एकत्र आलेल्या सर्वांच्या पाठीशी पक्ष ठामपणे उभा राहील, असा विश्वास माजी आमदार बाळाराम पाटील यांनी व्यक्त केला.













शेकाप पदाधिकाऱ्यांकडून वृक्षतोडीची पाहणी

सह्याद्रीच्या पर्वतरांगा हा महाराष्ट्राचा अभिमान आहे. याच सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या कर्जत येथील भीमाशंकर परिसरातील हजारो झाडे नष्ट करण्यात आली. याबाबत शेकाप नेते माजी आ. बाळाराम पाटील, शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, खालापूरचे शेकाप नेते संतोष जंगम, जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम आदींसह कर्जत खालापूर तालुका चिटणीस यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली. टोरंट कंपनीने केलेल्या वृक्षतोडीची भयावह परिस्थिती पाहून पदाधिकाऱ्यांनी घोषणा देत निषेध व्यक्त केला.







सत्ताधारी खुर्चीसाठी लाचार

जे सत्तेवर बसले आहेत, त्यांच्या हातात काहीच नाही, असा आरोप राज ठाकरे यांनी केला.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील, राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, मनसेचे युवा नेते अमित ठाकरे, बाळा नांदगावकर, अविनाश जाधव, संदीप देशपांडे, मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम, संतोष जंगम, खालापूर तालुका चिटणीस किशोर पाटील, कर्जत तालुका चिटणीस तानाजी मते, पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी अन्य पदाधिकारी, कर्जत पर्यावरण बचाव समितीचे समन्वयक ॲड कैलास मोरे, राजेश लाड यांच्यासह शेतकरी कामगार पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मनसे रेल्वे युनियन अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी प्रास्तविक केले.

मुख्यमंत्र्यांवर टीका..

मुख्यमंत्री सांगतात केंद्राने आणि खासगी कंपनी यांनी सांगितले आणि आम्ही हा प्रस्ताव मान्य केला. याचा अर्थ, मुख्यमंत्री खरे बोलत असून, उद्योगपती वरती जातात, शाह-मोदी यांना भेटतात आणि तेथून राज्याला आदेश दिले जातात. सत्तेची आणि पदाची भीती यांना आहे. दिल्लीपुढे मान झुकवणारे सत्ताधारी आम्हाला नको अशी टिका राज ठाकरे यांनी केली.



तुम्ही हात जोडू नका

वर्षानुवर्षे पाली सायडोंगर येथे वास्तव्यास असलेल्या महिलांना आज हात जोडण्याची वेळ येत आहे. ही चिंतेची बाब आहे. महिलांनी आता सक्षमपणे आवाज उठविण्याची वेळ आली आहे. त्यामुळे घरातील कोयते फक्त फांद्या कापण्यासाठी वापरू नका तर स्वतःच्या संरक्षणासाठी उभे रहा असे आवाहन राज ठाकरे यांनी केले. सह्याद्रीच्या कुशीत २३ प्रकल्प येत आहेत. त्यातील तीन प्रकल्प केंद्र सरकारचे असून, बाकी खासगी आहेत.

भांडवलदार पैशाच्या जीवावर जंगलतोड करीत आहेत या ठिकाणी डेटा सेंटर येणार असून त्यासाठी पाणी आणि वीज मोठ्या प्रमाणात लागणार आहे. या ठिकाणी बाहेरून येणाऱ्यांसाठी जी तयारी सुरू आहे असा आरोप राज ठाकरे यांनी केला.

ग्रामीण जेन झी कुठे आहेत?

आता आपल्याला बेसावध राहून चालणार नाही, असे सांगून राज ठाकरे यांनी ग्रामीण भागातील जेन झी कधी जागे होणार? कधी उठणार? असा सवाल उपस्थित केला. तुम्ही थंड आणि शांतपणे हे सर्व सहन करणार असाल तर मला या ठिकाणी येऊन नेतृत्व करायचे नाही. शिवछत्रपतींचे नाव अभिमानाने घेतात स्वतःला घ्यायचे, मावळे म्हणता, तरी गप्प का बसता, असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला.

प्रकल्प थांबेल; पण...

सत्ताधारी विरोध पाहून काही दिवस प्रकल्प बंद करतील त्यानंतर वीज बंद करतील आणि आपल्याला वीजपुरवठा बंद होण्याची भीती दाखवतील. वीज कमी पडते असे सांगून टोरंटची गरज आहे, असे भासवतील आणि त्यानंतर प्रकल्प रेटला जाईल, त्यामुळे मराठी बांधवाने सतर्क राहण्याची गरज आहे असा सावधानतेचा इशारा राज ठाकरे यांनी दिला.

जंगलातील पक्ष्यांनी कुठे जायचे?

आपण जंगल तोडले जात असताना शांत बसलो आहोत. पण, त्या झाडांवरील पक्षी आकाशात घिरट्या घालत आहेत. हे विदारक चित्र तेथे असून, भविष्यात आपल्यावरही अशी स्थिती येणार आहे. मग त्यावेळी आपण शांत बसून राहणार आहात काय, असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला. याविरोधात तरुणांनी पेटून उठायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी राज ठाकरे यांनी शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र वाचून तमाम जनतेला शिवरायांची जनतेकडून असलेली अपेक्षा व्यक्त केली. शिवरायांच्या केवळ जयंती आणि पुण्यतिथी साजरी न करता त्यांचे विचार कृतीतून दाखवून देण्याची गरज महाराष्ट्राला तसेच सत्ताधाऱ्यांनाही असल्याचे ठामपणे सांगितले.

मुख्यमंत्रीसाहेब, फक्त वकिली करा!

टोरंटची वकिली करणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज ठाकरे यांनी प्रश्न विचारले यामध्ये वीजसंपन्न महाराष्ट्र असताना आणखी १३,००० मेगावॅट वीज कशाला? हे सर्व प्रकल्प एमएमआरमध्ये सुरू असून, भविष्यात एमएमआर गुजरात राज्याला जोडायचे आहे का? गुजराती उद्योगपतींसाठीच हा सर्व खटाटोप का? जगाने नाकारलेला डेटा सेंटर महाराष्ट्रात कशासाठी? पंप स्टोरेज प्रकल्प झाल्यावर हा प्रकल्प जगातील मोठा प्रकल्प असणार आहे, मात्र याच प्रकल्पांतून निर्माण होणारी वीज कोण वितरित करणार? कोणाला वितरीत करणार? केवळ उद्योगपतींची वकिली न करता मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत असे आवाहन राज ठाकरे यांनी केले.

शहा देवाचे तरी ऐका!

महाराष्ट्र खासगी लोकांना देण्याचे अमित शहा यांनी ठरवले आहे. कुऱ्हाडीचा आवाज येतो, पण देवाच्या काठीचा आवाज येत नाही. त्यामुळे त्यांची काठी ज्यावेळी पडेल, त्यावेळी तुम्हाला जाग येईल, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला. महाराष्ट्रावर संकट आले, तर आपण सर्वांनी एकत्र यायलाच हवे, असे आवाहनही त्यांनी केले.

तरुणांनो, आपली वनसंपदा 'सोशल' करू नका!

सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुण-तरुणींकडून चांगले व्हिडिओ देण्यात येत आहेत. आपले हिरवेगार सोने आपण अशा व्हिडीओच्या माध्यमातून देऊ नका, असे आवाहनही त्यांनी केले.

पोलिसांनो, जंगल तोडणाऱ्यांना साथ देऊ नका

छत्रपतींना उत्तर देणार असाल तर पेटून उठा. आपला हक्क अन्य कोणाच्या हाती देऊ नका. पोलिसांनो, जंगल तोडणाऱ्यांना साथ देऊ नका. तुम्हालाही कुटुंब आहे, भविष्यात येणारी पिढी याबद्दल तुम्हाला जाब विचारेल याचा विचारही करा असा सल्ला राज ठाकरे यांनी दिला.

हजारो लीटर पाण्याची नासाडी | **संभाव्य पाणीटंचाईवर प्रशासन निष्क्रिय**

गारंबी धरणाच्या जलवाहिनीला गळती

| रेवदंडा | प्रतिनिधी |

एकीकडे पावसाने दडी मारल्याने आगामी काळात पाणीटंचाईचे सावट गडद होण्याची शक्यता निर्माण झाली असताना, दुसरीकडे मुरुड-गारंबी धरणातून पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीतून हजारो लिटर पाणी अक्षरशः वाया जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. नागशेत ते शिघ्रे दरम्यान जलवाहिनी फुटल्याने गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती सुरू आहे. मात्र, या गंभीर समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याऐवजी संबंधित पाणीपुरवठा विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. पाणी जपण्याचे आवाहन जनतेला करायचे आणि दुसरीकडे सरकारी यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे पाण्याची नासाडी सुरू राहायची, हा कसला कारभार? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. यंदा पावसाने अपेक्षित सातत्य न राखल्याने पाणीसाठ्याबाबत चिंता वाढत आहे. आगामी काळात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना, धरणातून नागरिकांपर्यंत पाणी पोहोचवणाऱ्या जलवाहिनीतच गळती सुरू राहणे ही बाब गंभीर मानली जात आहे. नागशेत-शिघ्रे दरम्यान फुटलेल्या जलवाहिनीतून किती पाणी वाया गेले, गळती नेमकी कधी सुरू झाली आणि ती अद्याप दुरुस्त का करण्यात आलेली नाही, असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाले आहेत.



मात्र, पाणीटंचाईचे संकट उभे राहण्यापूर्वीच उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि पाणीपुरवठा यंत्रणेतील त्रुटी दूर करणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी नाही का? जलवाहिनी फुटल्यामुळे पाणी वाया जात असताना संबंधित विभागाने तातडीने दुरुस्ती करणे अपेक्षित होते.

संबंधित कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली का आणि दुरुस्तीला विलंब होण्यामागचे कारण काय, याची स्पष्ट माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे.नागशेत ते शिघ्रे दरम्यानच्या जलवाहिनीची तातडीने पाहणी करून गळती कायमस्वरूपी बंद करावी, पाण्याची नासाडी थांबवावी आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी नियमित देखभाल व तपासणीची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

पाणी वाचवण्याच्या घोषणा कागदावरच?

पाणी हे सार्वजनिक संपत्ती असून त्याचा अपव्यय रोखणे ही केवळ नागरिकांचीच नव्हे, तर शासन आणि संबंधित विभागांचीही जबाबदारी आहे. पाण्याची बचत करा, पाणी जपून वापरा, असे आवाहन वारंवार केले जाते. परंतु प्रत्यक्षात जलवाहिनी फुटून पाणी वाया जात असेल आणि त्याकडे वेळेत लक्ष दिले जात नसेल, तर अशा आवाहनांचा उपयोग काय?

मारहाणप्रकरणी आठ जणांवर गुन्हा दाखल

नवीन पनवेल : खारपाडा टोल नाक्यावरील मारहाण प्रकरणी आठ जणांसह इतरांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी अद्याप कुणालाही अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.२५ ऑक्टोबर रोजी रात्री खारपाडा टोल नाक्यावर टोल भरण्यावरून प्रवासी आणि टोल कर्मचाऱ्यांमध्ये वाद झाला. या वादाचे पर्यावसन जोरदार हाणामारीत झाले. खारपाडा टोल नाक्यावरून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या प्रवासी बसच्या टोलच्या रकमेवरून हा वाद सुरू झाला. यावेळी पोलिसांच्या समोर हा सर्व प्रकार घडला. सार्वजनिक रस्त्यावर शांतता भंग होईल अशा प्रकारे गर्दी करून टोल नाक्यावर एकमेकांना शिवीगाळ करून धक्काबुक्की करण्यात आली. २६ ऑक्टोबर रोजी पनवेल तालुका पोलिसांनी बसमधील प्रवासी राजेंद्र अरुण महाके (वय ३७ रा. चेंबूर) भूपेश करू नारायणकर, रविंद्र महादेव वीर, राहुल शांतो दास आणि खारपाडा टोल नाका येथील प्रणय आधुनिक ठाकूर, करण रमेश तांडेल, केतन राजाराम पाटील, कांतीलाल महादेव घरत तसेच इतर कामगार आणि टोल नाक्यावर काम करणारे व खारपाडा गावातील काही रहिवासी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास अभिजीत व्हरांबळे पोलीस उपनिरीक्षक करत आहेत.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028

१९३७-२०२६ वर्ष ९०

विरोध नेमका कशाला?

एकीकडे दुष्काळाने महाराष्ट्र पोळून निघालेला असताना राज्य सरकार काय करते आहे तर लाखो झाडे तोडण्याचे प्रकल्प राबवत आहे. त्याबाबत ओरडा झाल्यानंतर विकासाचे कारण पुढे केले जात आहे. कर्जतच्या साईडोंगर परिसरातील झाडांच्या तोडीचे व्हिडिओ पसरल्यानंतर जनतेच्या संतापाचा भडका उडाला. खुद्द सत्ताधारी महायुतीमधून निषेधाचे सूर निघाले. तेव्हा मुख्यमंत्री फडणवीसांनी थोडा नरमाईचा सूर घेतला. अन्यथा, सर्व विरोधकांना देशद्रोही ठरवून ते मोकळे झाले होते. पण आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीत असलेले सयाजी शिंदे, शिंदे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर इत्यादींनी विरोध केल्यानंतर विरोधकांचे म्हणणे ऐकून घ्यायला आम्ही तयार आहोत अशी किमान भाषा तरी केली जात आहे. कर्जत प्रकल्पाच्या समर्थनार्थ फडणवीस पुन्हा पुन्हा ९० हजार झाडे लावली जातील असे सांगत आहेत. या संदर्भात त्यांनी एक श्वेतपत्रिकाच प्रसिद्ध करायला हवी. समृद्धी महामार्ग, अनेक उद्योग प्रकल्प, उड्डाणपूल, आरेची कारशेड इत्यादीउभारताना सरकार प्रत्येक वेळी अमुक इतकी झाडे लावू असे सांगत असते. हिंमत असेल तर या झाडांची सद्यस्थिती काय याचा जबाब सरकारने द्यावा. सर्वपक्षीय शिष्टमंडळ तेथे न्यावे, विधिमंडळाची समिती आणि पत्रकारांचा दौराही आयोजित करावा. सरकारने लावलेल्या झाडांपैकी २५ टक्के झाडे तरी जगली असतील का याबाबत शंका आहे. दुसरे असे की, कर्जत प्रकल्पाच्या बदल्यात सरकार स्वतःहून ९० हजार झाडे लावणार असे सांगत आहे. याचा अर्थ यामध्ये लाखो झाडे तुटणार आहेत हे उघड आहे. त्याखेरीज सरकारने स्वतःहून हे मान्य केले नसते. सरकारने अधिकृतपणे दिलेल्या माहितीनुसार ६४ हजार झाडांची कत्तल होईल असे कागदपत्रांमध्ये म्हटले आहे. पण प्रत्यक्षात हा आकडा बराच अधिक असणार हे सरकारच्या आजवरच्या कारभाराकडे पाहून सहज म्हणता येते. याच प्रकारे सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये किमान ५० ते ६० प्रकल्प व्हायचे आहेत. याबाबत सरकारने वेगवेगळ्या वेळी वेगवेगळा आकडा सांगितलेला आहे. किमान २३ प्रकल्पांची अधिकृत माहिती उपलब्ध आहे. त्यात नाशिक, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग अशा जिल्ह्यातील प्रकल्पांचा समावेश आहे. अदानी, टोरेंट, जेएसडब्ल्यू अशा कंपन्यांच्या हातून हे सर्व घडायचे आहे.

डेटा सेंटरच्या फायद्यासाठी

महाराष्ट्रातील विजेची गरज पाहता असे प्रकल्प आवश्यकच आहेत असा एक मतप्रवाह आहे. शिवाय असे प्रकल्प पुढे आले की, लगेच विरोधासाठी विरोध सुरू होतो असेही काहींना वाटते. या संदर्भात काही आकडे पाहायला हवेत. सध्या आपली कमाल वीज मागणी सुमारे ३२ हजार मेगावॉट आहे. ती २०३० पर्यंत वाढून ४४ हजार मेगावॉट होईल असा अंदाज आहे. अवघ्या चार वर्षांमध्ये इतकी वाढ होण्याचे कारण म्हणजे मुख्यतः डेटा सेंटर्सची मागणी वाढणार आहे. पूर्ण देशापैकी तब्बल ६६ टक्के डेटा सेंटर्स महाराष्ट्रात उभी राहणार आहेत. डेटा सेंटर्समध्ये कुलिंग प्रक्रियेसाठी प्रचंड पाण्याची गरज असते. अमेरिकेमध्ये यामुळे मोठमोठे जलाशय रिकामे झाल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळेच न्यूयॉर्क राज्याने पुढील एक वर्षापर्यंत एकही नवीन डेटा सेंटर न उघडण्याचे ठरवले आहे. इतर अनेक राज्यांमध्ये डेटा सेंटर्सवर बंदी घालण्यात आली आहे. जवळपास ८० टक्के अमेरिकी लोकांचा या डेटा सेंटर्सना विरोध आहे. त्यामुळे ही सेंटर्स भारतासारख्या देशांमध्ये हलवली जात आहेत. भारतात डेटा सेंटर्स चालवण्यासाठी कुशल मनुष्यबळ आहे. शिवाय, विकासाच्या नावाखाली फुकटात जमीन व पाणी उपलब्ध करून देणारे फडणवीस किंवा चंद्राबाबू नायडू यांच्यासारखे मुख्यमंत्री आहेत. नायडूंच्या राज्यात विशाखापट्टण इथे गुगलचे अतिप्रचंड डेटा सेंटर होणार आहे. विशाखापट्टणला आधीच पाणीटंचाई आहे. त्यात आता या सेंटरची भर पडणार असल्याने तेथे आंदोलन चालू आहे. मुद्दा असा की, कर्जतपासून खाली सिंधुदुर्गापर्यंत निसर्गाची वाट लावून, पाण्याची पळवापळवी करून, जमिनी ताब्यात घेऊन आणि हजारो लोकांना विस्थापित करून ही डेटा सेंटर्स उभी राहणार आहेत. यातून गुगल किंवा मायक्रोसॉफ्ट वगैरे कंपन्यांना फायदा होईल. पण महाराष्ट्र किंवा देशाला यात फार काही मिळणार नाही. नोकऱ्याही खूपच कमी तयार होतील.

पर्यायी उर्जा

अशा स्थितीत या विकासाची किंमत महाराष्ट्राने का मोजायची असा प्रश्न आहे. ही किंमत या बड्या कंपन्यांकडून वसूल केली जायला हवी. प्रत्यक्षात त्यांना करसवलती व इतर पायघड्या घातल्या जात आहेत. उजनीच्या पाण्यावरही एक डेटा सेंटर काढायच्या हालचाली चालू आहेत अशा बातम्या आहेत. ज्या उजनीवर सोलापूर आणि परिसराची सगळी शेती अवलंबून आहे तो आज पाण्याअभावी होरपळून निघतो आहे. तिथे डेटा सेंटरचा विचार करणे हाही गुन्हा मानायला हवा. आज कर्जतमध्ये वीज कंपनीचे नाव म्हणून टोरेंट सर्वांना ठाऊक झाली आहे. पण प्रत्यक्षात ही बड्या अमेरिकी आणि इथल्या भारतीय कंपन्यांची टोळीच झाली असून तिला स्थानिक सरकारांची साथ आहे. या प्रकल्पांबाबत सरकारने जनतेला नेहमीप्रमाणे अजिबात विश्वासात घेतलेले नाही. दाभोळच्या एनरॉन प्रकल्पाबाबतही हेच घडले होते. अचानक एनरॉन कंपनीचे गुणगान सुरू झाले. स्थानिकांपैकी काहींना हाताशी धरून जमिनी बळकावल्या गेल्या. आज टोरेंट, अदानी इत्यादी भारतीय भांडवलदार त्या भूमिकेत आहेत. पंप स्टोरेज प्रकल्पामध्ये डोंगराच्या खाली व वर असे दोन मोठे जलाशय करावे लागतील. यात साठवले जाणारे पाणी हे नदीतून वळवले जाईल. हे खालचे पाणी वर नेऊन दहा टर्बाईनच्या साह्याने वीज निर्माण केली जाईल. पाणी वर नेण्यासाठी वापरली जाणारी वीज ही सौर किंवा पवन उर्जेच्या साह्याने निर्माण केलेली असेल असे सरकार सांगते. त्यामुळे ही वीज क्लिन किंवा स्वच्छ आहे असा दावा सरकार करते आहे. पण तीन हजार मेगावॉट वीज निर्मितीसाठी सतत पाणी वर न्यावे लागेल. या लिफ्ट करण्याच्या उद्योगासाठी वीज लागेल. ते केवळ सौर किंवा पवन उर्जेवर शक्य नाही हे अनेक जाणकारांनी दाखवून दिले आहे. म्हणजे त्यासाठी कोळशावर आधारलेल्या औष्णिक विजेचाच वापर करावा लागेल. त्यासाठी भरपूर प्रदूषण होणार आहे. म्हणजे कोळशावरची वीज वापरून दुसरी वीज निर्माण करण्याचा हा उपद्व्याप आहे. त्यातील लाभहानीच्या आकड्यांबाबत अनेकांना शंका आहेत व सरकार त्यांची खुलेपणाने उत्तरे देण्यास तयार नाही. उलट या प्रकल्पाचे समर्थन करण्यासाठी कोणालाही वेठीला धरले जात आहे. भाजपच्या पाठिंब्यावर निवडून गेलेले उज्वल निकम यांनी याबाबत काल ट्विट केले व हा प्रकल्प कसा आवश्यक आहे ते सांगितले. निकम हे विजेचे किंवा उर्जेचे जाणकार नाहीत. त्याच्याशी त्यांचा दुरान्वयानेही संबंध नाही. यावरून सरकार प्रकल्पाच्या समर्थनासाठी कोणत्या थराला जात आहे हे लक्षात यावे. सरकारने आपली उर्जा खोट्यानाट्या गोष्टींच्या प्रचारासाठी व समर्थनासाठी न वापरता पवन आणि सौर यासारख्या पर्यायी इंधनाच्या निर्मितीसाठी वापरली तर अधिक बरे होईल. आजचा प्रकल्पांचा विरोध हा सरकारला त्या दृष्टीने ताळ्यावर आणण्यासाठी आहे.

विचार

नार्को-दहशतवादाचे आंतरराष्ट्रीय षडयंत्र

पाकिस्तानतर्फे पंजाब आणि राजस्थानच्या सीमेवर रात्रीच्या अंधारात ड्रोन्सच्या साहाय्याने सतत अमली पदार्थांची पाकिटे, आधुनिक पिस्तुले-स्फोटके फेकली जात आहेत. सीमा सुरक्षा दलाने शेकडो ड्रोन्स पाडले असले आणि अनेक तस्करांचा खात्मा केला असला, तरी पाकिस्तानची ही कुरापत अखंड सुरु आहे. भारताला अस्थिर करण्यासाठी, तरुणाईला उद्ध्वस्त करण्यासाठी आणि अशांतता पसरवण्यासाठी पाकिस्तान हे करत आहे.



आरिफ शेख

लक्षद्वीपनजीक अरबी समुद्रात एका संशयास्पद नौकेतून तीन हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्याचे अमली पदार्थ हस्तगत करणे आणि त्या नौकेवरील पाच पाकिस्तानी नागरिकांना बेड्या ठोकणे, ही घटना केवळ एका मोठ्या तस्करी मोहिमेचा पर्दाफाश करणारी नसून भारताच्या सुरक्षेपुढील एका अत्यंत धोकादायक, आंतरराष्ट्रीय आणि सुनियोजित षडयंत्राचे जिवंत उदाहरण आहे. भारतीय तटरक्षक दल, नौदल आणि नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो यांच्या संयुक्त आणि अचूक मोहिमेमुळे ही प्रचंड मोठी खेप रोखण्यात यश आले आहे. ही कारवाई केंद्र सरकारच्या 'नशामुक्त भारत' अभियानाप्रती असलेल्या कटिबद्धतेची आणि सुरक्षा यंत्रणांच्या वाढत्या कार्यक्षमतेची साक्ष देते. आंतरराष्ट्रीय स्तरावर, अगदी अमेरिकेच्या नेतृत्वानेही अमली पदार्थांच्या विरोधातील भारताच्या या दृढ निश्चयाची वेळोवेळी दखल घेतली आहे; मात्र केवळ आंतरराष्ट्रीय समुदायाकडून कौतुकाची थाप मिळणे पुरेसे नाही. त्यासोबतच जगाने आपला शेजारी देश पाकिस्तान कशा प्रकारे शासकीय पातळीवर अमली पदार्थांच्या व्यापाराला खतपाणी घालून शेजारील देशांमध्ये अराजक माजवण्याचे काम करत आहे, हेही डोळे उघडून पाहिले पाहिजे. परंतु, जागतिक राजकारणातील दुटप्पी धोरणे पाहता भारताने पाकिस्तानवर केवळ आंतरराष्ट्रीय समुदायाकडून स्वतःहून कठोर पावले उचलली जातील, या भ्रमात राहणे आत्मघातकी ठरेल. भारताला आपली सुरक्षा, सार्वभौमत्व आणि अंतर्गत स्थैर्य राखण्यासाठी स्वतःच सर्वसमावेशक, आक्रमक आणि दीर्घकालीन रणनीती आखावी लागेल.

या ताज्या कारवाईचे विश्लेषण केले, तर एक गोष्ट लख्खपणे समोर येते, ती म्हणजे अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी भारताला आपल्या दक्षता यंत्रणांची क्षमता अनेक पटींनी वाढवावी लागेल. तस्करांच्या आणि त्यांच्या सूत्रधारांच्या मनात भारतीय सागरी सीमा अथवा जमिनी सीमा ओलांडून देशात अमली पदार्थ आणणे अशक्यप्राय असल्याची दहशत बसत नाही, तोपर्यंत या समस्येवर निर्णायक मात करता येणार नाही. सध्याची वस्तुस्थिती अशी आहे, की भारताच्या विस्तीर्ण सागरी सीमा आणि जमिनी सीमांवरून वारंवार मोठ्या प्रमाणावर नशेचे साठे जप्त होत आहेत. याचा एक अर्थ असा होतो, की सुरक्षा यंत्रणा सतर्क आहेत; परंतु याचाच दुसरा आणि चिंताजनक अर्थ असाही होतो, की शेकडो प्रयत्नांपैकी काही प्रयत्न पकडले जात असले, तरी काही छुपे साठे देशाच्या आत पोहोचत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. केवळ सीमांवरच नव्हे, तर देशाच्या अंतर्गत शहरांमध्ये, महानगरांमध्ये आणि ग्रामीण भागांमध्येही सातत्याने अमली पदार्थांचे मोठे साठे आणि स्थानिक वितरक पकडले जात आहेत. ही संपूर्ण साखळी केवळ बाहेरून सुरू होत नाही, तर तिला आतूनही स्थानिक गुन्हेगारांचे आणि दलालांचे पाठबळ लाभत आहे. ही अंतर्गत साखळी मुळासकट नष्ट होत नाही, तोवर मागणी आणि पुरवठ्याचे हे दुष्टचक्र पूर्णपणे थांबवणे कठीण जाईल.

अमली पदार्थांचे हे संकट केवळ समाजकल्याण किंवा सार्वजनिक आरोग्यापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवर थेट आघात करणारे 'नार्को-टेररिझम' अर्थात नार्को-दहशतवादाचे रूप धारण करून पुढे आले आहे. या काळ्या धंद्यातून मिळणारा अफाट पैसा थेट दहशतवादी संघटनांच्या, फुटीरतावादी घटकांच्या आणि संघटित गुन्हेगारी सिंडिकेट्सच्या तिजोरीत जमा होतो. या व्यवस्थेत एका बाजूला अमली पदार्थांच्या माध्यमातून देशातील तरुण पिढीला, म्हणजेच राष्ट्राच्या सर्वात उत्पादक मनुष्यबळाला नशेच्या गर्तेत लोटून मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या पंगू बनवले जाते आणि दुसऱ्या बाजूला त्याच नशेच्या विक्रीतून कमावलेल्या पैशातून अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, दारूगोळा, स्फोटके आणि दळणवळणाची साधने खरेदी करून भारतीय जवानांवर व निष्पाप नागरिकांवर हल्ले चढवले जातात. हा एकाच वेळी समाज, अर्थव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा या तिन्हींना आतून पोखरून काढणारा एक सुनियोजित छद्म युद्धाचा प्रकार आहे. अशा परिस्थितीत केवळ अंमली पदार्थविरोधी कायद्यांची अंमलबजावणी करून भागणार नाही, तर या गुन्ह्याकडे देशविरोधी युद्धाचा भाग म्हणून कठोरपणे पाहिले जाणे अत्यावश्यक बनले आहे. या संपूर्ण कटामागे ज्या देशाचा सर्वात मोठा हात आहे, तो म्हणजे पाकिस्तान. भारताच्या विरोधात पारंपारिक युद्धात वारंवार पराभव पत्करावा लागल्यानंतर पाकिस्तानने 'भारताला हजारो जखमा देऊन रक्तबंबाळ करण्याचे' धोरण अवलंबले आहे. नार्को-दहशतवाद हा याच धोरणाचा मुख्य कणा आहे.

पाकिस्तानच्या पश्चिम सीमेवरून, विशेषतः अफगाणिस्तानच्या अफीम उत्पादक पट्ट्यातून सुरू होणारा हा प्रवास पाकिस्तानमार्गे भारताकडे वळवला जातो. पाकिस्तानी लष्कर आणि तिथल्या दहशतवादी संघटना यांच्यातील साटेलोटे आता जगासमोर पूर्णपणे उघडे पडले आहे. नुकत्याच जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत 'लष्कर-ए-तोयबा'चा कुख्यात पाकिस्तानी कमांडर मुसा मारला गेला. प्राथमिक तपासात आणि गुप्तचर माहितीनुसार हे सिद्ध झाले आहे, की हा दहशतवादी पूर्वी पाकिस्तानी लष्कराचा नियमित सैनिक अथवा कमांडर म्हणून कार्यरत होता. जम्मू-काश्मीरमध्ये भारतीय लष्कराच्या हातून अशा प्रकारे पाकिस्तानी सैन्याचा प्रत्यक्ष किंवा निवृत्त सैनिक मारला जाण्याची ही पहिली वेळ नाही. भूतकाळात कारगिल युद्धापासून काश्मीरमधील अनेक दहशतवादी चकमकींपर्यंत अशा सैनिकांचे मृतदेह सापडले आहेत, ज्यांची अधिकृत मोजदाद करणेही कठीण आहे. हा प्रकार हेच सिद्ध करतो, की पाकिस्तानमधील तथाकथित 'नॉन-स्टेट ॲक्टर्स' (अशासकीय घटक) हे प्रत्यक्षात तिथल्या सरकारी सैन्याचे आणि 'आयएसआय' या गुप्तचर संस्थेचेच प्रशिक्षित मोहरे आहेत. त्यांना आधुनिक लष्करी रणनीती, शस्त्रास्त्रांचे हाताळणी आणि गनिमी काव्याचे प्रशिक्षण थेट सैन्याच्या छावण्यांमध्ये दिले जाते.

पाकिस्तानच्या भूमीवर आजही 'जैश-ए-मोहम्मद', 'लष्कर-ए-तोयबा' यांसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनांचे तळ, प्रशिक्षण केंद्रे आणि भर्ती शिबिरे उघडपणे सुरू आहेत. आंतरराष्ट्रीय समुदायावर, विशेषतः 'फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स'सारख्या संस्थांवर धूळफेक करण्यासाठी पाकिस्तान कागदोपत्री काही फुटीरतावाद्यांवर गुन्हे दाखल करतो किंवा त्यांना नजरकैदेत ठेवण्याचे नाटक करतो; परंतु वास्तवात ही केवळ धूळफेक असते. त्या देशाची खरी सत्ता ज्या रावळपिंडीतील लष्करी मुख्यालयातून चालते, तिथे भारताच्या विनाशाचे मनसुबे रचले जातात. सीमाभागात भारतीय जवानांचे लक्ष विचलित करण्यासाठी पाकिस्तानी चौक्यांवरून होणारा विनाकारण गोळीबार हा नेहमीच या दहशतवाद्यांना आणि तस्करांना सुरक्षित वाट करून देण्यासाठी केला जातो. त्यामुळे अमली पदार्थांची तस्करी आणि सीमेवरील दहशतवाद या दोन वेगवेगळ्या गोष्टी नसून एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे लक्षात घेणे अनिवार्य आहे. या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानबाबत अधिक आक्रमक, वास्तववादी आणि दबाव निर्माण करणारे धोरण अवलंबणे गरजेचे आहे. पाकिस्तान आपल्या कुरापतींपासून स्वतःहून कधीही परावृत्त होणार नाही, हा इतिहास आहे. त्यामुळे केवळ सीमेवर सतर्क राहून बचावात्मक पवित्रा घेणे भारताला परवडणारे नाही. भारताने आता अशी रणनीती राबवली पाहिजे, ज्यायोगे अशा देशविरोधी कारवाया करणे पाकिस्तानला आर्थिक, राजनैतिक आणि सामरिकदृष्ट्या प्रचंड महागात पडेल.

आता आंतरराष्ट्रीय मंचांवर पाकिस्तानच्या नार्को-टेररिझमचे पुरावे, जप्त केलेल्या बोटींचा डेटा, पकडलेल्या तस्करांचा कबुलीजबाब आणि ड्रोनच्या माध्यमातून मिळालेले तांत्रिक पुरावे भक्कमपणे मांडले पाहिजेत. अमेरिकेसारखे देश, जे भारताच्या ड्रग्जविरोधी अभियानाचे तोंड भरून कौतुक करतात, त्यांना केवळ कौतुक करून मोकळे होता येणार नाही; पाकिस्तानला मिळणाऱ्या आर्थिक मदतीवर, आंतरराष्ट्रीय कर्जांवर आणि व्यापारी सवलतींवर या मुद्द्यावरून बंधने आणण्यासाठी भारताने राजनैतिक दबाव वाढवला पाहिजे.

चर्चा आजची

लवकरच लाकुडतोड्याचा बंदोबस्त होणार

संतोष राऊळ

यंदा गेल्यावर्षीच्या तुलनेत फारच कमी पाऊस पडला. त्याच्या झळा सप्टेंबर महिन्यापासूनच बसू लागल्या आहेत. गेल्या वर्षी जी धरणं १०० टक्के भरून वाहत होती ती धरणं आज जेमतेम ९० ते ९५ टक्के भरली आहेत. एप्रिल-मे महिन्यात जी पाणीकपातीची वेळ प्रशासनावर येते तीच वेळ ऑक्टोबर महिन्यापासूनच प्रशासनावर आली आहे. त्यामुळे पुढल्यावर्षी चांगला पाऊस पडेपर्यंत पाण्याची मोठी टंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आणि या पाणीटंचाईला एक लाकुडतोड्या जबाबदार असल्याचं बोललं जात आहे. कारण महाराष्ट्रातील जंगलांच्या जंगले तोडली जात आहेत. आधी मुंबईतील आरे जंगल, त्यानंतर नाशिकमधील कुंभमेळ्याच्या ठिकाणची झाडे तोडली. आणि त्यातच आता कर्जतमधील सायडोंगरावरील हजारो झाडे तोडण्याचा घाट महाराष्ट्रातील लाकुडतोड्याने घातला असल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. येथील जंगल तोडण्यासाठी पालघर जिल्ह्यातून लाकूडतोडे बोलविण्यात आले होते. परंतु, या मागचा खरा लाकुडतोड्या कोण हे जनतेला कळू लागले आहे. त्यामुळे त्याला वेळीच रोखण्यासाठी सर्व पक्षीयांनी आणि जनतेने एकत्र येणं गरजेचं आहे. आणि आता सर्वजण एकत्र येतही आहेत. त्यामुळे लवकरच खऱ्या लाकुडतोड्याचा बंदोबस्त होईल, असे सर्व सामान्य जनतेतून बोलले जात आहे.

विकासाच्या नावाखाली विद्यमान सत्ताधारी लाकूडतोड्या बनले आहेत. त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे एका प्रकल्पासाठी कर्जतमधील सायडोंगरावर होणारी हजारो झाडांची कत्तल. या प्रकल्पामुळे म्हणे हजारोंच्या हाताला काम मिळणार, परिसरात मोठी विकास कामे होणार. विकास कोणाला नको असतो? पण, तो विकास असाही नसावा की, त्यासाठी निसर्गाशी छेडछाड करावी लागेल. सध्या विकासाच्या नावाखाली गुजरातच्या टोरंट पॉवर प्रकल्पासाठी सायडोंगरावरील कागदोपत्री सुमारे ३२ हजार झाडांची कत्तल सुरू करण्यात आली आहे. या कत्तलीला जिल्ह्यासह राज्यभरातून विरोध होताना दिसत आहे. मात्र, असे असतानाही सरकार हा प्रकल्प रोखण्याऐवजी अद्यापही प्रकल्पाला समर्थन देत आहे. विशेष म्हणजे स्थानिक लोकप्रतिनिधी देखील प्रकल्पासाठी झाडांची कत्तल करण्यासाठी समर्थन देत आहेत. त्यामुळे त्यांच्यावरही स्थानिक पातळीवरून संताप व्यक्त होत आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकल्प पुर्ण करण्यासाठी संपूर्ण जोर लावलेला दिसत आहेत. परदेशातील महाराष्ट्रात येणारे प्रकल्प गुजरातला पळवले आणि गुजरातचे प्रकल्प महाराष्ट्राच्या माथी मारत आहेत. तेही कागदोपत्री ३२ हजार पेक्षा झाडांची कत्तल करून. मुख्यमंत्री म्हणतात की, या जागेच्या आणि झाडांच्या बदली कंपनीने दुसऱ्या ठिकाणी जागा उपलब्ध करून दिली असून, त्या जागी याच्या दुप्पट झाडे लावणार असल्याचे सांगितले. परंतु, ही झाडे लावणार कधी, ती मोठी कधी होणार, किती जगणार हा प्रश्न पडला आहे. आधीच राज्यात दुष्काळी वातावरण आहे. आणि त्यात हजारो झाडांची कत्तल. आणि ही झाडे तोडण्यासाठी लाकूडतोडेही थेट पालघर जिल्ह्यातून आणल्याची माहिती समोर आली आहे.

सध्या सर्वसामान्य जनतेला प्रश्न पडलाय की, जर कंपनी प्रशासनाकडे सध्या तोडण्यात येणाऱ्या झाडांच्या दुप्पट झाडे लावण्यासाठी जागा उपलब्ध असेल तर, मग त्याच ठिकाणी प्रकल्प का नाही उभारला जात आहे. त्यांचा डोळा जंगलावरच का? कंपनी प्रशासन आणि विद्यमान सरकार पर्यायी जागेवर झाडे लावेलही, परंतु जीथली झाडे तोडली जात आहेत, तो प्राणी पक्षांचा निवारा देखील आहे, हे सबंधित प्रशासनाने विसरून कसं चालेल? त्यांच्या निवाऱ्याचं काय? असे एक ना अनेक प्रश्न सर्वसामान्य जनतेमधून उपस्थित होत आहेत. सर्वसामान्य जनतेने वन विभागातील एखादं झाड तोडलं तरी वन विभागाकडून लगेचचं कारवाई होते. आणि महाराष्ट्रातील लाकुडतोड्या आख्ख जंगलच तोडत आहे आणि विद्यमान लोकप्रतिनिधी त्याला जाहिर पाठिंबा देत आहेत. तसेच, या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल असेही लोकप्रतिनिधी आणि मुख्यपमंत्री महोदयांकडून बोलले जात आहे. परंतु, जिल्ह्यात अशा बऱ्याच मोठंमोठ्या कंपन्या आहेत, जेथे स्थानिक कामगारांपेक्षा परप्रांतीय कामगार भरलेलं असतात. त्यामुळे जरी या ठिकाणी विद्यमान सरकारने बळजबरीने प्रकल्प उभारलाचं तरी या ठिकाणी स्थानिकांना डावळून परप्रांतीय कामगारांचीची भर असणार असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. त्यामुळे आता कुठे जंगलावर पोट भरणाऱ्यांना ही कंपनी झाल्यावर उपासमारीची वेळही येऊ शकते, अशीही शक्यता सर्वसामान्यांतून वर्तविली जात आहे. स्थानिकांची वाताहत तर होईलच, परंतु येथील वन्यजीवांचा आधीवासही नष्ट होईल. त्याचा तरी विचार लाकुडतोड्याने करायला हवा. या मागचा खरा लाकुडतोड्या कोण, हेही आता जनतेला कळू लागलं आहे. त्यामुळे त्याला वेळीच रोखणे गरजेचे आहे. आता सत्ताधारी सोडले तर इतर सर्वपक्षीय नेते या जंगलतोडीच्या विरोधात एकवटलेले आहेत. त्यामुळे लवकरच लाकुडतोड्यासह टोरंट कंपनी प्रशासनाला बोजा बिस्तरा उचलून जावेच लागेल, अशी शक्यता वर्तविली जात आहे.



लोकसंसद

'क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ आहे' याची तिन्ही प्रकारांत प्रचिती!

२०२६-२७ च्या सध्याच्या जागतिक क्रिकेट हंगामात सुरु असलेल्या कसोटी सामने, एकदिवसीय सामने (ओडीआय) आणि टी-२० सामने, या तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये सध्या क्रिकेटच्या अनिश्चिततेची प्रचिती येत आहे. पहिला सामना हरल्यानंतर ग्केबरहा येथील दुसऱ्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेने तब्बल ५६ वर्षांनी मायभूमीत ऑस्ट्रेलियाचा एक डाव आणि ३१ धावांनी ऐतिहासिक पराभव केला. दुसरीकडे एकदिवसीय सामन्यांमध्येही अनिश्चिततेने कहर केला. जागतिक क्रिकेटमध्ये बलाढ्य संघ मानला जाणारा इंग्लंड संघ पाकिस्तानमध्ये होत असलेल्या एकदिवसीय तिरंगी लढतीत जिंकता जिंकता दोनदा हरला. प्रथम श्रीलंकेने आणि त्यानंतर पाकिस्तानने इंग्लंडला हरवून अशक्यप्राय विजय नोंदवले. एकदिवसीय सामन्यांत कोणताही संघ कधीही पुनरागमन करू शकतो हेच यावरून सिद्ध झाले. टी-२० क्रिकेटने तर अनिश्चितता आणि थराराची सीमाच ओलांडली आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरा सामना याचे उत्तम उदाहरण आहे. न्यूझीलंडने दिलेले १९९ धावांचे मोठे आव्हान भारतीय संघाने केवळ १३.२ षटकांत पार केले. विशेषतः युवा फलंदाज अभिषेक शर्माने कीवी गोलंदाजांची अक्षरशः धुलाई करत अवघ्या ३५ चेंडूंत झंझावाती शतक ठोकले आणि भारताला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. या तिन्ही प्रकारांमधील वाढत्या अनिश्चिततेमुळे 'क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ आहे' हे प्रसिद्ध वाक्य आजच्या काळातही तंतोतंत खरे ठरताना दिसत आहे.

- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

इंटरनेटने बदलले जगाचे रूप!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. एकेकाळी केवळ संगणक आणि तंत्रज्ञान क्षेत्रापुरते मर्यादित असलेले इंटरनेट आज प्रत्येकाच्या हातातील मोबाइलपर्यंत पोहोचले आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण अनेक कामांसाठी इंटरनेटचा वापर करतो. एखाद्या दिवशी अचानक इंटरनेट बंद पडले किंवा मोबाइलमधील इंटरनेट पॅक संपला, तर आपली किती गैरसोय होते, याची जाणीव आपल्याला होते. यावरून इंटरनेटचे आपल्या जीवनातील महत्त्व लक्षात येते.

इंटरनेटच्या इतिहासात २९ ऑक्टोबर १९६९ हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी अमेरिकेत या संगणक नेटवर्कच्या माध्यमातून दोन संगणकांदरम्यान पहिला संदेश पाठवण्याचा प्रयत्न करण्यात आला. अमेरिकेच्या संरक्षण विभागाच्या संशोधन प्रकल्पातून या नेटवर्कची निर्मिती झाली होती. त्या काळात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध सुरू होते. संशोधकांना दूरवर असलेल्या संगणकांमधील माहितीची देवाणघेवाण करता यावी, हा या प्रयोगामागील प्रमुख उद्देश होता. कॅलिफोर्निया विद्यापीठातील लॉस एंजेलिस येथील संशोधक चार्ली क्लाइन यांनी स्टॅनफोर्ड रिसर्च इन्स्टिट्यूटमधील संगणकावर हा शब्द पाठवण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रणाली बंद पडल्याने सुरुवातीला केवळ ही दोन अक्षरेच दुसऱ्या संगणकापर्यंत पोहोचली. हा छोटासा संदेश पुढे जगात माहिती आणि तंत्रज्ञानाची क्रांती घडवणाऱ्या प्रवासातील ऐतिहासिक टप्पा ठरला. १९६९ च्या अखेरीस या नेटवर्कला चार संगणक जोडले गेले होते. पुढे याच तंत्रज्ञानाचा विकास होत आधुनिक इंटरनेटचा विस्तार झाला. शिक्षण क्षेत्रात इंटरनेटमुळे मोठी क्रांती झाली आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन व्याख्याने, डिजिटल पुस्तके, शैक्षणिक व्हिडिओ आणि विविध अभ्याससाहित्य सहज उपलब्ध होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही घरबसल्या दर्जेदार शैक्षणिक माहिती मिळवण्याची संधी निर्माण झाली आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि दूरस्थ शिक्षण यामुळे ज्ञानाची दारे अधिक व्यापक झाली आहेत. आरोग्य क्षेत्रातही इंटरनेट उपयुक्त ठरत आहे. ऑनलाइन डॉक्टरांचा सल्ला, दूरस्थ वैद्यकीय सेवा, तपासणी अहवाल मिळवणे आणि रुग्णांच्या वैद्यकीय नोंदी जतन करणे यांसारख्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. विशेषतः दुर्गम भागातील रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. व्यापार आणि बँकिंग क्षेत्रात इंटरनेटमुळे आमूलाग्र बदल झाले आहेत. ऑनलाइन खरेदी-विक्री, डिजिटल बँकिंग, यूपीआयद्वारे पैशांचे व्यवहार, वीजबिल भरणे, तिकीट आरक्षण आणि विविध सरकारी सेवांचा लाभ घेणे घरबसल्या शक्य झाले आहे. त्यामुळे वेळ, श्रम आणि प्रवासाचा खर्च वाचतो. अनेकांना ऑनलाइन व्यवसाय, घरबसल्या काम आणि रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत. समाजमाध्यमांचे व्यसन, चुकीच्या माहितीचा प्रसार, ऑनलाइन फसवणूक, सायबर गुन्हे, वैयक्तिक माहितीची चोरी आणि मुलांच्या स्क्रीन टाइममध्ये होणारी वाढ या गंभीर समस्या आहेत. त्यामुळे इंटरनेट वापरताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. अनोळखी लिंकवर क्लिक करणे टाळावे, पासवर्ड सुरक्षित ठेवावेत, ओटीपी कोणालाही सांगू नये आणि माहितीची सत्यता तपासूनच ती पुढे पाठवावी. इंटरनेट हे ज्ञान, संवाद आणि विकासाचे प्रभावी साधन आहे. त्याचा योग्य वापर केल्यास वैयक्तिक प्रगतीपासून देशाच्या आर्थिक विकासापर्यंत अनेक फायदे मिळू शकतात.

मात्र, तंत्रज्ञानाचा वापर माणसाच्या प्रगतीसाठी व्हावा, माणसाने तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊ नये. इंटरनेटने जग जवळ आणले आहे; आता या तंत्रज्ञानाचा वापर अधिक सुरक्षित, जबाबदार आणि विधायक पद्धतीने करणे ही काळाची गरज आहे.

- श्याम ठाणेदार

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२९ ऑक्टोबर

१) रेश्मा रामा कोळी
वेश्वी, अलिबाग
२९-१०-१९६४



कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

जेट्टी विकासाचा फायदा कोणाला?

• श्रीवर्धन शहरवासियांना भरतीच्या पाण्यापासून धोका

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

मागील दोन वर्षांपासून श्रीवर्धनच्या जीवनाबंदर या परिसरात नव्याने जेट्टी विकसित करण्यात येत आहे. परंतु, ही जेट्टी विकसित करण्याअगोदर याचा सखोल अभ्यास करण्यात आला का? हा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित होत आहे. या प्रश्नी काही तज्ञ इंजिनियर्स लोकांचा अभिप्राय घेणे गरजेचे होते. जेट्टीच्या विकासाचे काम सुरू झाल्यानंतर या कामासाठी लाखो टन मोठमोठाले दगड आणून समुद्रामध्ये भराव करण्यात आलेला आहे. त्यावरती बुरुम, माती व सद्यस्थितीत कॉंक्रीट टाकून ठेवलेले आहे. जेट्टीचे काम पूर्ण झाल्यानंतर या जेट्टीचा फायदा श्रीवर्धनमधील मच्छिमार बांधवांना होणार आहे की, पर्यटन व्यावसायिकांना होणार आहे याबाबत अद्याप कोणत्याही प्रकारची स्पष्टता शासनाकडून करण्यात आलेली नाही.



धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची उंची वाढवण्याची आवश्यकता

भविष्यात श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला भरतीच्या पाण्याचा बसलेला तडाखा ही धोक्याची घंटा असून धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची उंची कमीत कमी दोन मीटरने वाढवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी या ठिकाणाच्या लोकप्रतिनिधींनी आत्ताच सर्वे करून त्या कामासाठी लवकरात लवकर सुरुवात करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

या जेट्टीच्या बांधकामानंतर श्रीवर्धन शहरातील फेस्टिवल बीच, मठाची स्मशानभूमी, शासकीय विश्रामगृह व दांडा स्मशानभूमी या परिसरामध्ये भरतीच्या पाण्याचा जोर एवढा प्रचंड वाढलेला आहे की, पावसाळ्यात उधाण असल्यानंतर भरतीचे पाणी धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर उलटून किनाऱ्याकडील भागामध्ये जमा होत आहे. ज्या ठिकाणी जेट्टी विकसित करण्यात आली आहे, त्याच्या समोरील भागात पूर्णपणे वाळू भरली आहे. जुनी असलेली जेट्टी सुध्दा पूर्णपणे वाळूने भरुन गेली आहे.

पूर्वी खालचा जीवना या ठिकाणच्या वस्तीला भरतीच्या पाण्यापासून धोका संभवत असे. परंतु, आता कितीही मोठी भरती आली तरी खालचा जीवना परिसरापर्यंत भरतीचे पाणी पोहोचतच नाही. जेट्टीच्या बांधकामामुळे पाण्याचा मारा हा समुद्र किनारपट्टीच्या मधल्या भागाला जोरदार बसत आहे. यामुळे धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरून खाली समुद्रामध्ये उतरण्यासाठी बांधण्यात आलेल्या पायऱ्या, गणेश विसर्जनासाठी बांधण्यात आलेले रॅम्प याचे वारंवार नुकसान होत आहे.

पावसाळ्या संपल्यानंतर या पायऱ्यांची दुरुस्ती करणे किंवा रॅम्पची दुरुस्ती करणे ही कामे मात्र नगर परिषदेकडून केव्हाही वेळेवर केली जात नाहीत. पर्यायाने पर्यटकांना समुद्रामध्ये उतरण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागते. तर गणेश विसर्जनाच्या वेळी देखील नागरिकांना खूप मोठ्या प्रमाणात त्रास होतो. यावेळी गणेशोत्सवाच्या अगोदरच पावसाने दडी मारल्यामुळे समुद्राला उधाण कमी होते. त्यामुळे यावर्षी गणेश विसर्जन काहीसे चांगल्या प्रमाणात झाले. परंतु गणेशोत्सवाच्या काळात पावसाचा जोर मोठा असल्यास विसर्जनामध्ये प्रचंड अडथळे येतात. हे संपूर्ण श्रीवर्धन शहरातील नागरिकांनी अनुभवलेले आहे.

स्टोरी टेलिंग स्पर्धा उत्साहात

अलिबाग : समूह साधन केंद्र सांबरी येथे मंगळवारी (दि.२७) इयत्ता पहिली ते आठवीसाठी इंग्रजी स्टोरी टेलिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये इयत्ता पहिलीसाठी पोएम सिंगिंग, इयत्ता दुसरीसाठी चित्र पाहून नाव सांगणे, इयत्ता तिसरीसाठी स्पेलिंग रायटिंग, इयत्ता चौथीसाठी स्टोरीटेलिंग, इयत्ता पाचवीसाठी स्टोरी टेलिंग, इयत्ता सहावीसाठी निबंध लेखन, इयत्ता सातवीसाठी निबंध लेखन अशा पद्धतीच्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेसाठी सांबरी केंद्रातील एकूण रायगड जिल्हा परिषदेच्या नऊ शाळा सहभागी झाल्या असून एकूण २७ स्पर्धक सहभागी झाले होते. या केंद्राचे केंद्रप्रमुख संजय पोइलकर यांनी संपूर्ण स्पर्धेचं नियोजन केले होते. ही स्पर्धा रायगड जिल्हा परिषद शाळा कुर्डूस या ठिकाणी आनंदीमय वातावरणामध्ये पार पडली. या स्पर्धेच्या निमित्ताने या समूह साधन केंद्रातील आनंदवाडी शाळेचे सूर्यकांत पाटील तसेच केंद्रातील इतर सर्व शिक्षक, परीक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या नीता उपस्थित होत्या.



साई ट्रस्टकडून शैक्षणिक साहित्य

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्टकडून आसल येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य मदत म्हणून देण्यात आले.

नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्टकडून गेली १५ वर्षे शैक्षणिक क्षेत्रात कार्य करीत आहे. या संस्थेच्या वतीने आसल येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. संस्थेचे वतीने ट्रस्टचे अध्यक्ष गणेश अय्यर, संचालिका राधिका घुले, आदर्श शिक्षक आणि मुख्याध्यापक दिलीप घुले तसेच शिक्षक अहिरे आणि पालक उपस्थित होते.

शिवशंभो संघाची वार्षिक स्नेहसभा

। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

शिवशंभो ज्येष्ठ नागरिक संघाची वार्षिक स्नेहसभा रविवारी (दि.२५) पार पडली. सुरुवातीला उपस्थित ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दत्ताजीराव तटकरे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर सन२०२५ आणि सन २०२६ या कालावधीमधील दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांच्या स्वागतानंतर वार्षिक अहवाल जमाखर्च वाचून दाखवण्यात आला. यावेळी उपस्थित सभासदांना ओळखपत्र देण्यात आले. तसेच अपंग असलेल्या सभासदांना त्याचप्रमाणे वय वर्ष ७५ झालेल्या



सभासदांना काठी देण्यात आली. ज्या सभासदांना काठी मिळाली नाही अशा सभासदांना लवकरच काठी देणार असल्याचे शिवशंभो जेष्ठ नागरिक संघ सुतारवाडीचे कार्याध्यक्ष किरण लडगे यांनी उपस्थित सभासदांना सांगितले. शिवशंभो ज्येष्ठ नागरिक संघ सुतारवाडीचे अध्यक्ष मनोहर साळवी, कार्याध्यक्ष किरण लडगे, सचिव हरिश्चंद्र महाडिक, उपाध्यक्ष वामन शिंदे, उपाध्यक्ष गोपीचंद कदम, सहसचिव सदा कोदे, खजिनदार गोपीनाथ दळवी, सहखजिनदार रणजीत शिर्के, महिला प्रमुख उषा शिर्के, उपकार्याध्यक्ष प्रभावती देशमुख, सह हिशोब तपासणीस हरिश्चंद्र कुरले, संचालक सोनू बुवा पडवळ, किसन पडवळ, मोहन दोशी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. तर विविध परिसरातील ज्येष्ठ नागरिक सदस्य, महिला सदस्यही उपस्थित होत्या.

आरोग्य-जागृतीविषयी व्याख्यानमाला

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

किशोरवयीन मुलींच्या शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक स्वास्थ्य, योग्य आहार-विहार, वैयक्तिक सुरक्षितता आणि कायदेविषयक हक्कांबाबत जागृती करण्याच्या उद्देशाने आयुर्वेद व्यासपीठाच्या पनवेल शाखेतर्फे 'कळी उमलताना' या व्याख्यानमालेचा शुभारंभ करण्यात आला. आयुर्वेद व्यासपीठ, इनरव्हील क्लब ऑफ पनवेल आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात आयोजित या उपक्रमाचे उद्घाटन



महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात ७२ विद्यार्थिनी आणि तीन शिक्षिकांनी सहभाग घेतला.

पनवेल महानगरपालिकेच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थिनींना किशोरवयातील शारीरिक व मानसिक बदल, मासिक पाळीतील घ्यावयाची काळजी, आरोग्यदायी जीवनशैली आणि स्वतःच्या हक्कांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शहरातील अधिकाधिक शाळांपर्यंत हा उपक्रम पोहोचविण्याचा आयोजकांचा मानस आहे. यावेळी इनरव्हील क्लबतर्फे विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

तळ्यात ऑक्टोबर हीटचा तडाखा

तळा : मान्सून माघारी गेल्यानंतर तळा तालुक्यात ऑक्टोबर हीटने कहर केला आहे. गेल्या आठवड्याभरापासून तापमानाने ३४ ते ३६ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. वाढत्या उष्णतेमुळे तळा बाजारपेठेवर आणि नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होताना दिसत आहे. सकाळी दहा वाजल्यापासूनच उन्हाचे चटके बसू लागल्याने दुपारच्या वेळी तळा बाजारपेठेत शुकशुकाट पाहायला मिळत आहे. कडक उन्हामुळे शेतकरी, कष्टकरी आणि दुकानदारांचे हाल होत आहेत. ग्राहकांची वर्दळ घटल्याने बाजारपेठेतील उलाढाल ३० ते ४० टक्क्यांनी घटल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. दुसरीकडे वाढत्या उष्म्याचा फटका नागरिकांच्या आरोग्यावरही बसत आहे. ग्रामीण रुग्णालय आणि खाजगी दवाखान्यांमध्ये डोकेदुखी, थकवा, उलट्या, सर्दी-ताप आणि डिहायड्रेशनच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे. ऑक्टोबर हीट आणखी काही दिवस कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली असून तळावासीयांनी काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

श्रमदानातून बंधारा पूर्ण



पाली/गोमाशी : नेणवली गावातील ग्रामस्थांनी श्रमदानातून मातीचा बंधारा यशस्वीरित्या बांधून पूर्ण केला आहे. श्री उदलाईमाता ग्रामस्थ मंडळ, नेणवली (मुंबई-ठाणे-पुणे) व महिला मंडळ यांच्या आयोजनातून हा उपक्रम पार पडला. हा केवळ मातीचा बंधारा नाही, तर गावाच्या स्वावलंबनाचा आणि एकतेचा भक्कम पुरावा आहे, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. सर्व ग्रामस्थांच्या अथांग परिश्रमातून आणि एकजुटीतून हा बंधारा पूर्ण झाला आहे. या श्रमदानात गावातील महिला भगिनींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. तरुण, ज्येष्ठ आणि महिला सर्वांनी एकत्र येऊन माती, दगड, गोण्या टाकून बंधाऱ्याचे काम केले. काही ठिकाणी ट्रॅक्टर आणि जेसीबीच्या सहाय्यानेही काम करण्यात आले.

पनवेलच्या लाईन आळीत रंगीबेरंगी कंदिलांची रेलचेल

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांचा सण नाही, तर माणसामाणसांतील प्रेम, आपुलकी आणि आनंदाचा उत्सव आहे. 'आली दीपावली, घेऊन आनंदाची दिवाळी' म्हणत आता सर्वत्र सणाची लगबग सुरू झाली आहे. श्रीमंतांच्या बंगल्यापासून ते गरिबांच्या छोट्याशा घरापर्यंत प्रत्येकाला आपल्या दारात आनंदाचा प्रकाश फुलवायचा आहे. याच आनंदाची रंगत पनवेलच्या ऐतिहासिक लाईन आळीतील बाजारपेठेत पाहायला मिळत आहे.

विविध रंगांचे, आकारांचे आणि आकर्षक नक्षीकाम असलेले



आकाशकंदील विक्रीसाठी सज्ज झाले आहेत. लाल, पिवळा, हिरवा, निळा अशा रंगांनी सजलेली दुकाने ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

फोल्डिंग कंदील आणि ३२ काड्यांच्या कंदिलांना बाजारपेठेत विशेष पसंती मिळत आहे. पारंपरिक कंदिलांपासून आधुनिक डिझाइनपर्यंत अनेक पर्याय ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. लहान मुलांच्या चेहऱ्यावर कंदील पाहताना उमटणारा आनंद दिवाळीच्या उत्साहात आणखी भर घालत आहे. आई-वडिलांसोबत कंदील निवडणारी मुले आपल्या आवडीचा रंग शोधताना दिसत आहेत. कंदिलाची किंमत किती, यापेक्षा तो आपल्या घराला किती सुंदर दिसेल, याचा विचार अनेकजण करतात. कारण दिवाळीचा खरा आनंद वस्तूंच्या किमतीत नसतो, तर त्या आनंदाने उजळणाऱ्या चेहऱ्यांमध्ये असतो.

'एक दिवा तुम्ही लावा, आम्ही सर्वांनी मिळून आनंदाचा प्रकाश पसरवू' हा संदेश यानिमित्ताने महत्त्वाचा ठरतो. लाईन आळीतील कंदिलांच्या दुकानांमुळे परिसरात सणासुदीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्राहकांची वर्दळ वाढू लागल्याने व्यापाऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

पणत्या, कॅन्डल्ससह विविध साहित्यनिर्मिती | **विविध कंपन्यांच्या माध्यमातून विक्री**

विशेष मुलांची दिवाळीसाठी जोरदार तयारी

। पेण । प्रतिनिधी ।

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि चैतन्याचा सण! याच सणाच्या स्वागतासाठी पेण येथील आई डे केअर या गतिमंद व मतिमंद मुलांच्या शाळेत सध्या उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. उटणे, पणत्या, आकाशकंदील, कॅन्डल्स, चकलीची भाजणी यांसह दिवाळीला लागणाऱ्या विविध वस्तू तयार करण्याची लगबग शाळेत सुरू आहे. या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे या सर्व वस्तूंची निर्मिती शाळेतील विशेष मुले स्वतःच्या हातांनी करत आहेत. या सर्व साहित्याची विक्री विविध कंपन्यांच्या माध्यमातून केली जाते.



संस्थापिका स्वाती महेंद्र मोहिते, मुख्याध्यापिका प्रेमलता पाटील, उपमुख्याध्यापिका विद्या खराडे तसेच शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली ही मुले दिवाळी साहित्य तयार करत आहेत. प्रत्येक मुलाच्या क्षमतेचा विचार करून त्यांना प्रोत्साहन दिले जात असून, त्यांच्या हातून साकार होणाऱ्या प्रत्येक वस्तूमध्ये मेहनत, जिद्द आणि शिकण्याची ओढ दिसून येत आहे. या उपक्रमातून मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच त्यांच्यातील आत्मविश्वास, स्वावलंबन आणि सर्जनशीलतेलाही चालना मिळत आहे.

या उपक्रमांतर्गत आतापर्यंत सुमारे ४२ हजार पणत्या आणि ८ ते ९ हजार कॅन्डल्स तयार करण्यात आल्या आहेत. विशेष

मुलांच्या मेहनतीला व्यापक व्यासपीठ

विविध कंपन्यांच्या माध्यमातून तसेच वेगवेगळ्या ठिकाणी स्टॉल लावून या साहित्याची विक्री होत असल्याने मुलांच्या मेहनतीला व्यापक व्यासपीठ मिळत आहे. त्यांच्या हातांनी तयार झालेल्या या पणत्या आणि कॅन्डल्सच्या प्रकाशातून यंदाची दिवाळी केवळ घरांनाच नव्हे, तर अनेकांच्या मनांनाही उजळवणारी ठरत आहे.

मुलांनी आपल्या कौशल्यातून साकारलेल्या या वस्तू म्हणजे केवळ दिवाळीचे साहित्य नसून, त्यांच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे प्रतीक आहेत. त्यांच्या या प्रयत्नांतून समाजालाही एक सुंदर संदेश मिळतो योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास प्रत्येक मुलामध्ये काहीतरी खास करण्याची क्षमता असते.

आई डे केअरमधील या उपक्रमामुळे विशेष मुलांच्या हातून तयार झालेल्या वस्तूंना दिवाळीच्या आनंदासोबतच त्यांच्या कष्टांची आणि कलागुणांचीही जोड मिळत आहे.

निवडक



सायबर सुरक्षाविषयी व्याख्यान

उरण : कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यावतीने आयोजित सायबर सुरक्षा व सामाजिक सुरक्षा या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत भागुबाई चांगु ठाकूर लॉ कॉलेज पनवेलचे विद्यार्थी राहुल भालेकर, गणेश पंडित, आयुष्य तिवारी व काशिनाथ शिंगवा हे उपस्थित होते. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी विद्यार्थ्यांनी सुरक्षित ऑनलाईन व्यवहार करावा. तसेच, मोबाईलचा वापर योग्य ठिकाणी व गरज असतानाच करावा, असे सांगितले. कार्यक्रमात राहुल भालेकर यांनी ऑनलाइन फिशिंगविषयी सविस्तर माहिती दिली. तर गणेश पंडित, आयुष तिवारी व काशिनाथ शिंगवा यांनी ऑनलाइन हॅकिंग, सोशल मीडिया, फोटो मार्फिन, कस्टमर फेक कॉल, बँक फेक कॉल व विविध फेक लिंक्स या संबंधात माहिती देऊन जागृती केली. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन व्यवहार करताना अतिशय दक्षपणे व्यवहार करावा व आपली सुरक्षा व आर्थिक फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी, असे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

वर्षावास मालिकेची यशस्वी सांगता

वाघ्रण : सालाबादप्रमाणे यावर्षीही बौद्धजन पंचायत समिती मुंबई तालुका शाखा अलिबागमार्फत आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या तीन महिन्याच्या कालावधीत वर्षावास मालिकेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तालुका बौद्धचार्यांच्या माध्यमातून बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन करण्यात आले. या वर्षावास मालिकेचा सांगता समारंभ सोमवारी (दि.२६) पंचशील बुद्धविहार पेझारी येथे



अलिबाग तालुका अध्यक्ष विकास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमास अलिबाग तालुका सचिव सुमित कांबळे, खजिनदार संतोष गायकवाड, बौद्धचार्य परशुराम ओव्हाळ, प्रभावती मोरे, अलिबाग तालुका रमाई महिला मंडळ सचिव संचिता गायकवाड, माजी तालुका अध्यक्ष विष्णू मोरे, माजी सचिव किशोर कांबळे गुरुजी, संजय जाधव माजी खजिनदार, शैलेंद्र गायकवाड आर.पि.आय. अलिबाग तालुका अध्यक्ष प्रमोद गायकवाड व इतर शाखांतील पदाधिकारी, उपासक, उपासिका मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.



चिल्हे विद्यालयाचे वक्तृत्व स्पर्धेत यश

खांब : श्री छत्रपती प्रतिष्ठान व स्वातंत्र्यवीर विचारमंच, रोहा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत श्रमिक विद्यालय चिल्हे येथील विद्यालयातील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता नववीतील आस्था थिटे हिने द्वितीय क्रमांकाचे, तर इयत्ता सहावीतील आराज्ञा भोईर हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या स्पर्धेत आस्था थिटे हिने 'नवरात्र आणि स्त्रीशक्ती' या विषयावर आपले परखड विचार मांडले. स्त्रीशक्तीचे सामर्थ्य, महिलांचे समाजातील स्थान आणि स्त्रीशक्तीचा जागर यांसारख्या विषयांवर तिने प्रभावीपणे भाष्य केले. तर आराज्ञा भोईर हिने 'माता सरस्वती आणि ज्ञानाचे महत्त्व' या विषयावर आपले विचार मांडताना ज्ञानाचे जीवनातील स्थान आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. दोन्ही विद्यार्थिनींनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने उपस्थितांची मने जिंकली. या यशामुळे विद्यार्थिनींमधील वक्तृत्वकला, आत्मविश्वास आणि वैचारिक अभिव्यक्तीला प्रोत्साहन मिळाले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात येत आहे.



धनलक्ष्मी बचत गटाची उत्तुंग भरारी

भाकरवड : अलिबाग तालुक्यातील पोयनाड बाजारपेठपासून दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या भाकरवडसारख्या खेडेगावात धनलक्ष्मी बचत गटाची २००७ साली स्थापना झाली. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जनोत्क्ती अभियान क्षितिज नवे विश्वास नवा आणि उमेदच्या माध्यमातून आपल्या कार्याची सुरुवात त्यांनी २५ किलो चकली भाजणीचे पीठ तयार करून केली. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला आणि त्यांचा उत्साह वाढला. नेहा भोसले मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रियदर्शनी मोरे प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा त्यांच्या मार्गदर्शनाखाली या उद्योगाला सुरुवात करण्यात आली. मिळालेल्या नफ्यातून त्यांनी अनारसे पीठ, लाडू, चकली, करंजी असे दिवाळीसाठी फराळ बनवले आणि तोही हातोहात संपले. त्यांचा आत्मविश्वास वाढला त्यांनी १२०० किलो अनारसे १००० किलो चकली किलो पिठाचे विक्री करण्यात आले आहे. मग त्यांनी किचनची शान असणारे पापड, गरममसाले विविध प्रकारची लोणची तयार केली आणि बाजारामध्ये विकली सुद्धा. स्वस्त आणि माफक दरात विक्री करूनही त्यांना खूप फायदा झाला. एका प्रकारे त्यांनी आपल्या परिवाराच्या पहिल्या चाकाला हातभार लावण्यास सुरवात केली. आज गेली १९ वर्षे हा बचतगट कार्यरत असून पोयनाड, अलिबाग, पेण, रोहा, उरण अशा तालुक्यात परिसरातील पन्नासहुन अधिक गावांमध्ये तयार केलेला माल विकला. या मालाला ग्राहकांची पहिली पसंती मिळवली. कोणत्याही प्रकारचे आध्यात्मिक, शैक्षणिक, लग्न, साखरपुडा, वाढदिवस अशा व विविध कार्यक्रमाला नाश्ता, जेवण देऊन या महिला बचत गटांनी आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.

पाली नगरपंचायतीवर धडकणार मोर्चा

२ नोव्हेंबरला मोर्चाचे आयोजन ; पाणी फिल्टर योजना, अवैध पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर



। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।

पाली शहरातील विविध नागरी समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि प्रस्तावित घरपट्टी करवाढीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या न्याय्य मागण्यांसाठी येत्या २ नोव्हेंबर रोजी पाली नगरपंचायतीवर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या अनुषंगाने पाली नगरपंचायत, पाली पोलीस स्टेशन आणि सुधागड-पाली तहसीलदार कार्यालयाला निवेदन देण्यात आले. पाली सुधागड संघर्ष समितीच्या वतीने मोर्चाची माहिती देऊन शहरातील प्रलंबित प्रश्नांवर ठोस कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

पाली शहरातील पाणीपुरवठा, रस्त्यांवरील अतिक्रमण, अवैध पार्किंग, स्वच्छता आणि रखडलेली विकासकामे यांसारख्या प्रश्नांवर नागरिकांकडून सातत्याने चिंता व्यक्त केली जात आहे. त्यातच प्रस्तावित घरपट्टी करवाढीचा विषय समोर आल्याने नागरिकांमध्येही चर्चा सुरू झाली आहे. करवाढीचा निर्णय घेण्यापूर्वी शहरातील नागरी सुविधांची सद्यस्थिती आणि विकासकामांचा हिशेब जनतेसमोर मांडावा, अशी मागणी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

नागरिक नियमितपणे कर भरत असताना त्यांना आवश्यक नागरी सुविधा मिळणे, त्यांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण होणे आणि नगरपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता असणे अपेक्षित आहे. त्यामुळे नगरपंचायतीने मागील पाच वर्षांतील उत्पन्न, खर्च, पूर्ण झालेली विकासकामे, प्रलंबित कामे आणि त्यावरील खर्चाचा सविस्तर तपशील जनतेसमोर मांडावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रस्तावित घरपट्टी करवाढीमागील कारणे, आर्थिक गणित आणि त्याचा सर्वसामान्य नागरिकांवर होणारा परिणाम यांचीही माहिती सार्वजनिक करावी, अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

पाली शहरातील पाणी फिल्टर योजनेची सद्यस्थिती स्पष्ट करून योजनेबाबत पुढील कार्यवाही जाहीर करावी, तसेच सर्व भागांत समान व नियोजनबद्ध पाणीपुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. रस्त्यांवरील अतिक्रमणांवर नियमानुसार आणि कोणताही भेदभाव न करता कारवाई करावी. अवैध पार्किंगच्या समस्येवर कायम स्वरूपी उपाययोजना करून रस्ते नागरिकांच्या सुरक्षित वापरासाठी मोकळे ठेवावेत, अशी मागणीही करण्यात येत आहे.

यासोबतच नमो उद्यानाच्या कामाची सद्यस्थिती स्पष्ट करावी, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन सुधारावे आणि प्रलंबित विकासकामांसाठी कालमर्यादेसह कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या तक्रारी व निवेदनांवर वेळेत कार्यवाही करून त्यांना लेखी उत्तर द्यावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. हा मोर्चा केवळ एका संघटनेपुरता मर्यादित नसून शहरातील नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी आवाज उठवण्याचा प्रयत्न असल्याची भूमिका संघर्ष समितीच्या वतीने मांडण्यात येत आहे. पाणी, रस्ते, पार्किंग, स्वच्छता, उद्यान आणि घरपट्टी हे प्रश्न प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आहेत. त्यामुळे या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी नागरिकांनी एकजुटीने पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

त्यामुळे पाली शहरातील प्रत्येक नागरिकाने, व्यापाऱ्याने, युवकाने आणि ज्येष्ठ नागरिकाने २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पाली सुधागड संघर्ष समितीच्या वतीने करण्यात येत आहे. आपल्या शहराच्या विकासासाठी, पारदर्शक कारभारासाठी आणि प्रलंबित नागरी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी नागरिकांची उपस्थिती महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले आहे.

मोर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांच्या मागण्यांवर स्पष्ट भूमिका मांडावी, प्रलंबित कामांसाठी कालमर्यादा निश्चित करावी आणि समस्यांच्या सोडवणुकीसाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात येत आहे. आज विविध संबंधित कार्यालयांना निवेदन दिल्यानंतर आता २ नोव्हेंबरच्या मोर्चाबाबत प्रशासन काय भूमिका घेते आणि नागरिकांच्या प्रश्नांवर कोणती कार्यवाही करते, याकडे पालीकरांचे लक्ष लागले आहे.

निवडक



रेवतळे येथे सेंद्रिय निविष्ठा प्रकल्प

महाड : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान उमेद अंतर्गत एकात्मिक शेती विकास प्रकल्प हिंदवी महिला प्रभागसंघ, करंजाडी आणि पंचायत समिती, महाड यांच्या माध्यमातून ग्राम पंचायत रेवतळे बौद्धवाडी येथे सेंद्रिय निविष्ठा प्रकल्पाचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. ग्रामीण भागातील महिलांना व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविणे, स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. महिला बचत गटांच्या माध्यम ातून उभारण्यात येणारे असे व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासोबतच महिलांच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतात. कार्यक्रमादरम्यान संदीप खिडबिडे यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व आणि त्याचे फायदे विशद केले. सेंद्रिय शेतीमुळे जमिनीचे आरोग्य व सुपीकता जपण्यास, पर्यावरणाचे संरक्षण करण्यास आणि रासायनिक निविष्ठांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होऊ शकते. शेतकऱ्यांनी पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा अवलंब करून शाश्वत शेतीच्या दिशेने वाटचाल करावी, असे या विषयाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

अस्मिता पाटील यांना पीएच.डी. जाहीर

अलिबाग : भाऊसाहेब नेने महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्रा.अस्मिता पाटील यांना मुंबई विद्यापीठाची डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पदवी जाहीर झाली आहे. त्यांच्या या यशामुळे सुतारपाडा गावासह शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. प्रा. अस्मिता पाटील यांनी डॉ. पतंगराव कदम कला व वाणिज्य महाविद्यालय, पेण, जि. रायगड येथील संशोधन केंद्रातून हिंदी



विषयात संशोधन पूर्ण केले. सूर्यबाला के कथा साहित्य में व्यक्ती, परिवार और समाज का स्वरूप या विषयावर त्यांनी आपला शोधप्रबंध सादर केला होता. संशोधन मार्गदर्शिका डॉ. संगीता चित्रकोटी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधनकार्य पूर्ण केले. त्यांच्या शोध प्रबंधाला विद्यापीठाने मान्यता दिल्यानंतर त्यांना पीएच.डी. पदवी जाहीर झाली. प्रा. अस्मिता पाटील यांचे महाविद्यालयीन शिक्षण लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय, पेझारी येथे झाले. या काळात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल बांगर तसेच सर्व प्राध्यापकांचे त्यांना सहकार्य लाभले.

'कोतवाल परीक्षा केंद्र मुरूडमध्येच द्या!'

आगरदांडा : मुरूड तहसीलदार कार्यालयामार्फत ११ पदांसाठी कोतवाल भरती प्रक्रिया सुरू असून, या भरतीसाठी तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातील एकूण १५१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. या उमेदवारांची परीक्षा १५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. मात्र, अद्याप परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले नसल्याने उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे कोतवाल भरती



परीक्षेचे केंद्र मुरूड येथेच निश्चित करावे, अशी मागणी अरविंद गायकर व कुणाल सतविडकर यांनी केली आहे. या भरती परीक्षेसाठी अलिबाग किंवा पनवेल येथे परीक्षा केंद्र दिले जाणार असल्याची चर्चा उमेदवारांम ध्ये सुरू आहे. मुरूड तालुक्यातील अनेक उमेदवार आर्थिकदृष्ट्या सामान्य कुटुंबातील असून, त्यांना दूरच्या परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचण्यासाठी आर्थिक व वाहतुकीच्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. विशेषतः पनवेल येथे परीक्षा केंद्र दिल्यास प्रवासासाठी अधिक वेळ लागण्याची शक्यता असून, त्यामुळे उमेदवारांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागू शकतो.

कोजागिरी उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

पनवेल : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) युवक आघाडी, पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या वतीने आयोजित दोन दिवसीय कोजागिरी पौर्णिमा उत्सवाला नागरिक आणि



युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ङ्गसमतेचा गर्व, युवकशक्तीचा जागरफ या संकल्पनेतून नवीन पनवेल येथील सेक्टर १९ मधील शिवा कॉम्प्लेक्स पार्किंग, गणेश मार्केटजवळ हा उत्सव उत्साहात पार पडला. या कार्यक्रम ाला रिपाई महिला आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या सीमा आठवले, राष्ट्रीय सचिव विनोद निकाळजे, महिला आघाडीच्या महाराष्ट्र सरचिटणीस ॲड. अभया सोनवणे, उषा रामलु, सरिता वाडेकर, डॉ. विजय मोरे, तालुकाध्यक्ष विजय पवार आणि शहराध्यक्ष निलेश सोनावणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- नोकरीची सुवर्णसंधी! - अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!, ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक, आकर्षक पगार, नोकरीचे ठिकाण: अलिबाग, रायगड मुलाखतीसाठी आजच संपर्क साधा! ९९२३७५०५३९/९१०५७१७०३८ इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा! चांगल्या पगारासह नोकरीची उत्तम संधी!
- कामासाठी माणसे गरजु मुले पाहिजे
१)मोबाईल डिलेव्हरीसाठी -पेण, पोयनाड, वडखळ, रेवदंडा, मुरूड, इतर मोटारसाईकलने बाईक आमची (लाईसन्स पाहिजे) २) कॉम्प्युटर ऑपरेटर लेडीज/जेन्टस, ३)पार्ट/ फुल टाईम पाहिजे. मो. ८८८८२२०२२१
- नोकरीची संधी - Tally Operator अलिबाग येथील कर सल्लागारांच्या कार्यालयासाठी Tally Operator आवश्यक आहे. अकाउंटिंगचे ज्ञान आवश्यक. वाणिज्य शाखेची शैक्षणिक पार्श्वभूमी असणे आवश्यक. अनुभवी उमेदवारांना प्राधान्य. महिला उमेदवारांना प्राधान्य. वय ३० वर्षांपेक्षा जास्त असावे. कार्यालयाचे ठिकाण : अलिबाग संपर्क : ९५९५०३२३२०/९८२३१३५५०१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

तटकरे महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील परिषद संपन्न

। माणगाव । प्रतिनिधी ।



माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथील वाणिज्य, बॅंफ, बीएमएस विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा यांच्या सहकार्याने भारतीय ज्ञान प्रणाली शाश्वत विकासासाठी वाणिज्य, व्यवसाय, करप्रणाली आणि व्यवस्थापनाचा पुनर्विचार या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.या परिषदेचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष ॲड.राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. ही परिषद उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

परिषदेच्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे नियामक मंडळ सदस्य माननीय डॉ. आबासाहेब पाटणकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय लक्ष्मीकांत नलबळवार, अधिष्ठाता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे उपस्थित होते. तसेच द. ग. तटकरे महाविद्यालय, तळा येथील महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष माननीय पुरुषोत्तम गोविंद मुळे हे अतिथी म्हणून उपस्थित होते. परिषदेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. आर. पांडेय यांनी केले.

परिषदेच्या तांत्रिक सत्रांमध्ये भारतीय ज्ञान प्रणाली आणि आधुनिक शिक्षण, प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचे आधुनिक शिक्षणात एकात्मीकरण तसेच प्राचीन भारतीय ज्ञान आणि सम कालीन वाणिज्य, व्यवस्थापन व उद्योजकता यांच्यातील संबंध या महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

परिषदेत डॉ. संजय नलबळवार, डॉ. उमेशकुमार बागल, डॉ. आमोद ठक्कर आणि डॉ. भरत करहाड यांनी भारतीय ज्ञानपरंपरा, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, आधुनिक शिक्षण, वाणिज्य, व्यवस्थापन आणि उद्योजकता या विषयांवर मार्गदर्शन केले.

परिषदेच्या समारोप सत्रात टिकमभाई मेथा वाणिज्य महाविद्यालय, माणगावच्या प्राचार्या डॉ. अमृता केशव देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

रायगड जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन

। रायगड । प्रतिनिधी ।

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत दरवर्षी आयोजित होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे रूपांतर यंदा विकसित भारत यंग लीडर्स डायलॉगमध्ये करण्यात आले आहे. या अनुषंगाने जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड यांच्या वतीने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात येत असून जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी आहे.

यंदा सांस्कृतिक ट्रॅक अंतर्गत सर्व स्पर्धांसाठी विकसित भारतासाठी नशामुक्त युवा ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. या अंतर्गत समूह लोकनृत्य, नोंदणीसाठी कोड स्कॅन करा, समूह लोकगीत, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य, कविता लेखन या पाच प्रमुख कलाप्रकारांचा समावेश असेल. जिल्हास्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या कलाकारांची आणि संघांची निवड विभागस्तरीय स्पर्धेसाठी केली जाईल. त्यानंतर राज्यस्तरावरून निवड होणाऱ्या सर्वोत्कृष्ट संघांना नवी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची ऐतिहासिक संधी मिळणार आहे.

प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन

। रायगड । प्रतिनिधी ।

सामाजिक क्रांतीचे प्रणेते क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचे २०० वे जयंती वर्ष राज्यभरात विविध प्रबोधनात्मक व शैक्षणिक उपक्रमांनी साजरे करण्यात येत आहे.

११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२७ हा कालावधी क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले जयंती वर्ष म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने १ एप्रिलच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

या जयंती वर्षानिमित्त वर्षभरात सर्व क्षेत्रीय कार्यालये, अधिनस्त शासकीय संस्था, आश्रमशाळा, नामांकित स्वयंसेवी संस्था तसेच शासकीय वसतिगृहांमध्ये विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये महात्मा फुले यांना अभिवादन करणे, प्रभातफेरी काढणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक विचार रुजवण्यासाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धा अशा अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाईल.

पाणीटंचाईची चाहूल लागताच नांदगावकर सरसावले

श्रमदानातून उभारला बंधारा

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।



पावसाचे प्रमाण कमी झाल्याने राज्यात अनेक ठिकाणी पाणीटंचाईचे सावट घोंगावत असताना नांदगाव ग्रामस्थांनी मात्र संकटाची वाट न पाहता पाणी वाचविण्याच्या दिशेने ठोस पाऊल उचलले आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेतून ग्रामस्थांनी श्रमदानातून बंधारा उभारून परिसरासमोर आदर्श निर्माण केला आहे.

श्री काळभैरव ग्रामस्थ मंडळ, नांदगाव व मुंबईकर मंडळी यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये गावातील अबाल-वृद्धांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभाग घेत श्रमदान केले.

पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे, परिसरातील भूजल पातळी वाढवणे आणि उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर मात करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विशेष म्हणजे केवळ माणसांचाच नाही तर गावातील मुक्या जनावरांचाही विचार करून हा बंधारा उभारण्यात आला आहे. उन्हाळ्यात पाण्यासाठी भटकंती करणाऱ्या जनावरांना या जलसाठ्याचा मोठा आधार मिळणार आहे.या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जे ग्रामस्थ प्रत्यक्ष श्रमदानासाठी उपस्थित राहू शकले नाहीत, त्यांनी आर्थिक मदत करून या कार्याला हातभार लावला. गावासाठी काहीतरी करण्याची भावना प्रत्येकाच्या मनात असल्याचे यातून पुन्हा एकदा दिसून आले.

राज्य अन्न आयोग अध्यक्ष पोहोचले अंगणवाडीत

कुपोषित बालकांना योजनांचा लाभ देण्याचे निर्देश

। रायगड । प्रतिनिधी ।



वाड्चा-वस्त्यांमधील एकही पात्र लाभार्थी शासकीय योजनांपासून वंचित राहणार नाही, याची संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. विशेषतः कुपोषित बालकांना अंगणवाडीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या पोषण, आरोग्य व बालविकासविषयक योजनांचा लाभ वेळेत मिळवून द्यावा, असे निर्देश राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी दिले.

राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे हे २६ ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी अलिबाग तालुक्यातील आदिवासी वाडी सांगाव येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी आदिवासी समाजातील लहान मुलांशी संवाद साधत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अंगणवाडीचे महत्त्व पटवून दिले.

बालकांनी नियमितपणे अंगणवाडीत जावे, तसेच त्यांना मिळणाऱ्या पोषण आहारासह विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले.

या दौऱ्यात अध्यक्ष महेश ढवळे यांनी हाशिवरे येथील महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच वाडगाव येथील प्राथमिक शाळा व अंगणवाडीला भेट देऊन पाहणी केली. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शैक्षणिक परिस्थितीची माहिती घेतली.

शाळा व अंगणवाड्यांमधून विद्यार्थ्यांना आणि बालकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांचा आढावा घेतला. तसेच संबंधित योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे की नाही, याची पाहणी केली.

'फळपीक विम्याचा लाभ घ्यावा'

रायगड : हवामान बदलांचा फळपिकांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील सर्व बागायतदार व फळपीक उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने हवामान आधारित फळपीक विमा योजनेत सहभागी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. दिलेल्या मुदतीत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होवून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

प्रशासकीय यंत्रणांचा सक्रिय सहभाग | **आपत्कालीन प्रतिसाद क्षमता तपासणी**

विळे-भागाड सीएनजी आरओ येथे मॉकड्रिल

। रायगड । प्रतिनिधी ।



महानगर गॅस लिमिटेडने आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद देण्याची क्षमता तपासण्यासाठी आणि वैधानिक आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी विळे भागाड येथील सिटी गेट स्टेशन परिसरातील सीएनजी रिटेल आउटलेट (आरओ) येथे नुकतेच लेव्हल-३ आपत्कालीन मॉकड्रिल आयोजित केले.

या ड्रिलदरम्यान सीएनजी कंप्रेसर क्षेत्राजवळ गॅस गळती होऊन फिल्ट्रेशन स्किडला आग लागल्याची परिस्थिती निर्माण करण्यात आली. या काल्पनिक आपत्कालीन परिस्थितीला प्रतिसाद देण्यासाठी लागणारा वेळ, विविध यंत्रणांमधील समन्वय आणि आपत्कालीन उपाययोजनांची अचूकता यांचे मूल्यांकन करण्यात आले.

या सरावात अग्निशमन दल, पोलीस प्रशासन, वाहतूक पोलीस, म्युच्युअल एड रिस्पॉन्स ग्रुप, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पथकांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पाच्या १०८ आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद यंत्रणेनेही या सरावात सहभाग नोंदवला. मॉक ड्रिल यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर अग्निशमन दल, पोलीस, वाहतूक पोलीस आणि मार्गाच्या प्रतिनिधींनी सरावाचे मूल्यांकन करून आपत्कालीन परिस्थिती अधिक प्रभावीपणे हाताळण्यासाठी आवश्यक सुधारणांबाबत सूचना मांडल्या. स्थानिक अग्निशमन दलाच्या प्रतिनिधींसह आर्से लर मित्तल, पॉस्को महाराष्ट्र स्टील लिमिटेड, आयनॉक्स एअर प्रॉडक्ट्स लिमिटेड आणि परिसरातील इतर उद्योगांमधील मार्ग सदस्यांनीही या सरावात सक्रिय सहभाग घेतला. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी एम जीएलने केलेल्या उपाययोजनांचे संबंधित प्राधिकरणांनी कौतुक केले. या मॉक ड्रिलमुळे औद्योगिक सुरक्षितता आणि समुदायाच्या संरक्षणासाठी उच्च दर्जाचे मानदंड कायम राखण्याची एमजीएलची तयारी तसेच एमआयडीसी विळे भागाड परिसरातील विविध यंत्रणांची सामूहिक कटिबद्धता अधोरेखित झाली.

मिनीट्रेन फटाकातील खड्डे बुजवले



। नेरळ । प्रतिनिधी ।

कल्याण कर्जत राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ पेट्रोल पंप समोरून नेरळ माथेरान मिनी ट्रेन मार्गिका आहे. त्या ठिकाणी यावर्षीच्या पावसाळ्यात प्रचंड प्रमाणात खड्डे पडले होते. हे खड्डे या रस्त्याने दररोज वाहतूक करणाऱ्या हजारो वाहनचालक यांच्यासाठी डोकेदुखी बनली होती. या फटकातील खड्डे पावसाळ्यात किमान दहावेळा भरण्यात आले होते. मात्र, पाऊस आल्यानंतर पुन्हा तेथे खड्डे पडायचे आणि त्यामुळे वाहनचालक यांच्यासाठी हा रस्ता त्रासदायक बनला होता. नेरळ माणगाव टेकडीमधील पाणी याच रेल्वे मार्गावरून वाहत येत असल्याने मोठ्या प्रमाणात खड्डे पडत होते. शेवटी पेव्हर ब्लॉक लावून देखील खड्डे बुजवण्याचा प्रयत्न झाला, मात्र रस्त्यावरील खड्ड्यावर उपाययोजना म्हणून मध्य रेल्वेकडून त्या ठिकाणी रस्त्याची वाहतूक एका एका बाजूने थांबवून ठेवत डांबरीकरण करण्यात आले. दरम्यान, नेरळ भागातील वाहनचालक यांच्याकडून हे खड्डे सातत्याने त्रासदायक असल्याचे सांगितले जात होते. आता खड्डेमुक्त प्रवास वाहनचालकांना करायला मिळणार आहे.

अलिबाग नगरपरिषदेतर्फे दिवाळी महोत्सवाचे आयोजन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या सणानिमित्त खरेदी, चविष्ट खाद्यपदार्थ आणि मनोरंजनाची मेजवानी अनुभवण्याची संधी अलिबागकरांना मिळणार आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे ३० ऑक्टोबरपासून 'दिवाळी महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे.

नगरपरिषदेच्या पटांगणात हा महोत्सव रंगणार असून, विविध वस्तूंच्या खरेदीसह खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शुक्रवार, (दि.३०) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता या महोत्सवाचे उद्घाटन अर्बन बँकेच्या अध्यक्ष सुप्रिया पाटील यांच्या हस्ते होणार आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक या कार्यक्रमाच्या पदसिद्ध सदस्य म्हणून उपस्थित राहणार आहेत.

३१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत स्टॉल नागरिकांसाठी खुले राहणार आहेत. खाद्यपदार्थ, दिवाळीचे साहित्य, कपडे, दागिने, अलंकार, घरगुती उत्पादने आणि इतर विविध वस्तूंचे स्टॉल येथे उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी एकाच ठिकाणी विविध पर्याय नागरिकांना मिळणार आहेत.

या कार्यक्रमाला अलिबाग नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, महिला व बालकल्याण विभागाच्या उपसभापती ॲड. अश्विनी ठोसर, डॉ. साक्षी पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्यासह सर्व सभापती, नगरसेवक आणि नगरसेविका उपस्थित राहणार आहेत. अलिबाग नगरपरिषदेच्या पटांगणात आयोजित या दिवाळी महोत्सवाला नागरिकांनी भेट देऊन खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन महिला व बालकल्याण विभागातर्फे करण्यात आले आहे.

-: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविळयात येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती या खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजेः बहिरमपाडा, ता.सुधागड, जि. रायगड येथील :-

खालील वर्णनाची मिळकत

मालकाचे नाव	सर्वे क्र./ गट नं.	एकूण क्षेत्र हे. आर	आकार रू. पै.	भोगवटा वर्ग
प्रदीप नामदेव शिंदे	१६/१/अ	०.७१.४० हे.आर. ०.४३.४० हे. आर	७.०७ पैकी	१

वरील मिळकतीसंबधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार अखत्यार लिएन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा कुळवहीवाट, ताबा, कबजा वहीवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉटेगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रिक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (०७) सात दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे,
दिनांक : २९/१०/२०२६

ॲड. रुचिता संतोष भगत,
ॲडव्होकेट
मु.पोष्ट जांभूळपाडा
ता. सुधागड, जि.रायगड
मोबा. नं: ९८६०२४७७३९

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशील यांनी मौजे पळस, ता. रोहा, जिल्हा रायगड या हद्दीतील खालील वर्णनाची जमिन धर्मेश किशोर गटानी यांच्या नांवे असलेली जमिन मिळकत त्यांचेकडून खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे. सबब सदरच्या मिळकतीचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे किंवा कसे सदरची मिळकत खरेदी करण्यास योग्य आहे किंवा कसे हे ठरवून मिळण्याकरिता व खरेदीखत करण्यास योग्य आहे किंवा कसे हे ठरविण्याकरिता सदरची जाहीर नोटीस आज रोजी प्रसिद्ध करित आहेत.

मिळकतीचे वर्णन :

मौजे पळस, ता. रोहा, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत
अ) सर्व्हे नं./गट नं./भूमापन नं. ८०/१, ज्याचे क्षेत्र ०.२७.५० अधिक पोट खराबा ०.०१.४०, एकूण क्षेत्र ०.२८.९० हे.आर.चौ.मी., आकारणी ५.१६
ब) सर्व्हे नं./गट नं./भूमापन नं. ८१, ज्याचे क्षेत्र ०.०५.९० अधिक पोट खराबा ०.०४.५०, एकूण क्षेत्र ०.१०.४० हे.आर.चौ.मी., आकारणी १.८१ असे आहे.

वरील जमीन मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर, वारस, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, अन्नवस्त्र, न्यायालयाची, जप्ती, वहिवाट, भाडेपट्टा, वहिवाट ताबे कब्जा व साठेकरार अगर कुठल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदी व्यवहारांस कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशील जबाबदार राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

पेण/दिनांक

ॲड. विधिती जयेश म्हात्रे.
दुर्वांकूर, चिंचपाडा, ता. पेण,
जिल्हा रायगड.
मोबाईल : ८७९३७५५१०५

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. बसंती संजय जैन, श्री. संजय मोतीलाल जैन यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे पुलाचीवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २४/२/अ/१२ एकुण ०.४०.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २९/१०/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक अस्पी जमशेठ इराणी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे लाडीवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार रू. पैसे
९/७	एकूण क्षेत्र ०-२७-४० हे आर पॉ	१-५६

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणा-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २९/१०/२०२६

खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल श्री. प्रभाकर कृष्णाजी पाटील सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. संतोष रामचंद्र निलधे व श्री. रमेश खंडु दळवी यांचे कडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर/हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु. पै.
१२/३	०.२०.००	०. ११
१२/२/ब/१	०.४२.०० पोट.ख. ०.०६.०० एकूण : ०.४८.००	०.२२

वरील वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २९/१०/२०२६.

सही/-
ॲड. पूजा गणेश म्हसे
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे पुनाडे, ता. उरण, जि.रायगड

भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.पॉ	आकारणी रु.पै.
९८/१/ई/२	एकूण क्षेत्र ०-२४-८० हे.आर	१.५०

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-

दिनांक :-२९/१०/२०२६

ॲड. रोहित रो.मानकवळे
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.अनिल दत्तात्रय कडव यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक सौ. शुभदा प्रशांत दळवी यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन मौजे. एकसळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू. पै.)
१९	११	०-१०-६०	१-१९

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २९/१०/२०२६

ॲड. नरेश रामदास आहीर.
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत, जि.रायगड- ४१०१०१.
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-नेरळ, ता. कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मालकाचे नांव	सर्व्हे नं	प्लॉट नंबर	क्षेत्र चौ.मी.	आकार रू.पै.
अशोक मुकुंद घाटपांडे आरती अशोक घाटपांडे	३७७	१	२८० चौ.मी.	२८.००
अनिता अशोक कुलकर्णी	३६९	८	२९८.७३ चौ.मी.	२९.८७

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वढाव बुद्रुक, ता.अलिबाग, जि.रायगड गट नं.२२८/३, एकूण क्षेत्र ०-१६-३० हे. आर. आकार ३.५४ रुपये ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रकाश नारायण नागांवकर यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २८/१०/२०२६

(ॲड. संजय द. म्हात्रे)
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वढाव बुद्रुक, ता. अलिबाग, जि. रायगड गट नं.२२८/२, एकूण क्षेत्र ०-१६-३० हे.आर. आकार ३.५० रुपये ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सुभाष नारायण नागांवकर यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त , साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २८/१०/२०२६

(ॲड. संजय द. म्हात्रे)
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे असे कळविण्यात येते की आमचे अशील यांनी मौजे खरवंडी ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्वे/गट नंबर ११ पैकी १) श्री प्रतीक सदानंद शेट्टी, २) श्रीमती तेजश्री वैभव थोरात यांचे मालकीची खालील नमूद केलेली शेतजमिन मिळकत त्यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली असून, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मौजे-खरवंडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, येथील मिळकतीचे वर्णन.

सर्वे/ गट नं	क्षेत्र हे. आर. प्र	आकार. रु.पै.
११	२.०९.० यापैकी १) श्री प्रतीक सदानंद शेट्टी २) श्रीमती तेजश्री वैभव थोरात यांचे मालकीचे खरेदी करण्याचे ठरलेले क्षेत्र हे.आर.प्र ०.४८.००	५.०६

तरी वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकारार, बयाणापावती, गहाणखत, दान, बक्षीस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, मृत्यूपत्रांकित, चार्ज, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास संबंधितांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात यावी, याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटिस दिली.

तारीख २९.१०.२०२६

सही /-
अधिवक्ता अविष्कार अरुण अभंगे
मो नं-८०८७३४९०१८
पत्ता नेमीनाथ हाईट, मुद्रे बुद्रुक, कर्जत रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर २७/५ या मिळकतींवरील ''सिगल रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत चेंढरे अलिबाग'' या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील बिल्डींग नं.३ ए मधील निवासी सदनिका नं.१०१, क्षेत्र ४६७.३८ चौ. फुट (४३.४४ चौ.मीटर) चटई, ग्रामपंचायत चेंढरे मिळकत क्र.१७२३/१ ही निवासी सदनिका, या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक सचिन गजानन रूपनवर रा.मु.आदर्शनगर, वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू निवासी सदनिका निर्वेध असल्याचा भरवसा निवासी सदनिकेचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू निवासी सदनिकेवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर करावयात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास निवासी सदनिका निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २८/१०/२०२६

(ॲड. संजय द. म्हात्रे)
पत्ता -श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे महान, ता.अलिबाग, जि.रायगड, येथील १) गट नंबर २१६, एकुण क्षेत्र ०-०४-०० हे.आर., आकार ०.०६ रू. पै. २) गट नंबर २१७, क्षेत्र ०-७९-७० हे.आर., पो.ख. ०-०२-३० हे.आर. एकुण क्षेत्र ०-८२-०० हे. आर., आकार ९.५० रू.पै. या भातशेती मिळकती, या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री.प्रविण सदानंद कनोजे रा. फ्लॅट नं. १४, एम ८/१४, राजमाता सी. एच.एस. एलबीएस मार्ग, मुलुंड, चेक नाका, ठाणे ४००६०४ २) श्री. सुभाष सदानंद कनोजे रा.लक्ष्मी नारायण सीएचएस सी विंग, रूम नं.२२०३, २२ वा मजला, ईमामवाडा रोड, भेंडी बाजार, मुंबई ४००००९ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर करावयात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २८/१०/२०२६

(ॲड. संजय द. म्हात्रे)
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ

समर्थ सदन, दुसरा मजला ००२, प्लॉट नं. २४, सेक्टर ८, बँक ऑफ इंडियाच्या वरती,
खांदा कॉलनी, नविन पनवेल (प.), जि. रायगड ४१० २०६. दुरध्वनी क्र. ०२२-२७४५४७५०.
Email ID:- raigaddistsgb@gmail.com

जा.क्र. राजिसुरमं/२०२६/ दिनांक :-

जाहीर सुचना

विषय :- रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्यामध्ये वाढ करणेबाबत

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/सुरक्षा अधिकारी यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विविध कामगार संघटना यांनी सध्याच्या महागाईचा वा राहणीमानाचा विचार करता, सुरक्षा रक्षक/सुरक्षा अधिकारी यांच्या विद्यमान वेतन व भत्ते यामध्ये वाढ/सुधारणा करावी अशी मागणी केलेली आहे व मंडळाकडे या आशयाचे प्रस्ताव/निवेदने सादर केलेली आहेत. यापूर्वी मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या वेतन व भत्यामध्ये दि. ०१ मे २०२३ पासून वेतनवाढ करण्यात आलेली होती व सदर वेतनवाढीस ३ वर्षे पूर्ण झालेली असल्याने, सुरक्षा रक्षक संघटनांनी माहे १ मे २०२६ पासून वेतन व त्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० मधील तरतुदीनुसार नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतनाचे दर, भत्ते आणि अतिकालिक काम सेवेच्या इतर शर्ती निश्चित करण्याच्या किंवा त्यात सुधारणा करण्याच्या किंवा फेरबदल करण्याच्या प्रयोजनासाठी मंडळातील नोंदीत मुख्य मालक/नियोक्ता व त्यांच्या मालक संघटना (Association of Small Principal Employers) आणि त्यांच्याकडे मंडळातील कार्यरत नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या कामगार संघटना तसेच मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक व इतर सर्व संबंधितांच्या सूचना व हरकती मागवत वेतनाचे भत्ते व सेवा शर्ती निश्चित करण्याचे सुरक्षा रक्षक मंडळास अधिकार आहेत.

सुरक्षा रक्षकांना मिळणारे सध्याचे विद्यमान वेतन व भत्ते हे मागील काळात वाढलेला महागाई निर्देशांक, राहणीमान इत्यादी बाबींचा विचार करून वेतन व भते पुनः निर्धारीत करण्याचा प्रस्ताव मंडळाच्या विचाराधीन आहे.

त्यानुसार मंडळाने दिनांक १ मे २०२६ पासून पुढील ३ वर्षाकरीता (दि. ०१ मे २०२६ ते ३० एप्रिल २०२९ या कालावधीकरिता) मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक /सुरक्षा अधिकारी यांचे प्रस्तावित मूळ वेतन व इतर भत्ते पुनः निर्धारीत करण्याचे निश्चित केले असून, प्रस्तावित वेतन व भत्यांचे दर पुढीलप्रमाणे असतील.

अ. क्र.	हुद्दा	मूळ वेतन	विशेष भत्ता/ महागाई भत्ता (रु.)	घरभाडे भत्ता (मूळ वेतन व म.भत्यावर २०%) (रु.)	प्रवास भत्ता (रु.)	धुलाई भत्ता (रु.)	एकुण वेतन व भत्ते रु.	लेव्ही ४२.७५ टक्के लेव्ही (मुळ पगार व महागाई भत्ता)	एकूण वेतन व लेव्ही
१	सुरक्षा रक्षक	१४७१९	४१३४	३७७१	२६५०	१६७०	२६९४४	८०६०	३५००४
२	मुख्य सुरक्षा रक्षक	१४९९४	४१३४	३८२६	२६५०	१६७०	२७२७४	८१७७	३५४५१
३	सुरक्षा पर्यवेक्षक	१५६९४	४१३४	३९६६	२६५०	१६७०	२८११४	८४७६	३६५९०
४	सहा.सुरक्षा अधिकारी	१५९१९	४१३४	४०११	२६५०	१६७०	२८३८४	८५७३	३६९५७
५	सुरक्षा अधिकारी	१६३६९	४१३४	४१०१	२६५०	१६७०	२८९२४	८७६५	३७६८९
६	मुख्यसुरक्षा अधिकारी	१६८१९	४१३४	४१९१	२६५०	१६७०	२९४६४	८९५७	३८४२१

प्रस्ताविक वेतन व भत्यांचे दरांबाबत मंडळातील नोंदीत मुख्य मालक/ नियोक्ता व त्यांच्या मालक संघटना (Association of Small Principal) आणि त्यांच्याकडे मंडळातील कार्यरत नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या कामगार संघटना तसेच मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक व इतर सर्व संबंधितांच्या काही सूचना/ हरकती असल्यास ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाच्या आत मंडळाकडे लेखी स्वरुपात पाठविण्याची विनंती आहे. सदर सूचना / हरकती यांचा सागोपांग विचार करून सुरक्षा रक्षक /सुरक्षा अधिकारी यांच्या वेतनात सुधारणा/वाढ करण्याबाबत अंतिम निर्णय मंडळ देईल. विहीत केलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना/ हरकती यांचा विचार मंडळ करणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(अमोल मा.जाधव)
सरकारी कामगार अधिकारी, मुंबई
तथा सचिव, रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

भारताकडून झिम्बॉब्वेला 'क्लीन स्वीप'

| वडोदरा | वृत्तसंस्था |

■ वैष्णवी शर्माची जादुई फिरकी; फलंदाजांची धुवांधार बॅटींग

वडोदरा येथे पार पडलेल्या वनडे मालिकेतील तिसऱ्या व अखेरच्या सामन्यात भारतीय महिला संघाने ८ विकेट्सने विजय मिळवत झिम्बॉब्वेला 'क्लीन स्वीप' केले. याअगोदर फिरकी गोलंदाज वैष्णवी शर्माने घेतलेल्या पाच गडीच्या जोरावर भारताने त्यांना सर्वबाद १३१ धावांत रोखले होते. या धावांचा पाठलाग करताना भारताच्या पहिल्या फळीने जास्त सामना ताणला नाही. अखेर ३३ ओव्हर्स शिल्लक राखताना धावा करत तिसरा सामना आपल्या खिशात घातला.

झिम्बॉब्वेने दिलेल्या १३२ धावांचा पाठलाग करताना भारताला पहिल्याच चेंडूवर यास्तिका भाटीयाच्या रुपात पहिला धक्का बसला. नोमवेलो सिबांडाने भाटीयाला भोपळाही फोडू दिला नाही. त्यानंतर प्रतिका रावल (नाबाद ५९) व हर्लिन देवलंने संघाचा डाव सावरला. दरम्यान, हर्लिन (१९) लॉरेन फिरीची शिकार ठरली. त्यानंतर चौथ्या क्रमांकावर आलेल्या शेफाली वर्माने धुवांधार फलंदाजीस सुरुवात केली. प्रतिकाने ४ चौकार व ३ षटकार ठोकले, तर शेफालीने ६ चौकार व २ षटकारासह नाबाद ५१ धावा केल्या.

मुपाचिकवा व नमकोवाची एकाकी झुंज

झिम्बॉब्वेने टॉस जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. सलामीची मॉडेस्टर मुपाचिकवा (३७) आणि कर्णधार जोसेफीन नमकोवो (३५) वगळता त्यांचा कोणताच फलंदाज चांगली कामगिरी करू शकला नाही. वैष्णवी शर्माने त्यांना मनमोकळेपणाने खेळूच दिलं नाही.

सायली सतघरेने लॉर्यन फिरीला भोपळाही फोडू न देता झिम्बॉब्वेला पहिला धक्का दिला. त्यानंतर क्रांती गोडने आक्रमक चिपो तिरिपानो (४)ला शेफाली करवी झेलबाद करत झिम्बॉब्वेची अवस्था २ बाद १२ धावा अशी केली.

त्यानंतर हाकेच्या अंतरावर बिल्वड बिझा (१) वैष्णवी शर्माचा पहिला शिकार ठरली. तर ७ चौकार ठोकत खेळपट्टीवर टिकलेल्या मोडेस्टरला वैष्णवीने जास्त आक्रमक होऊ दिलं नाही. चेडझा धुरूरू (२०) ने काही काळ नमकोवोसोबत डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण तिलाही वैष्णवीने जिंतामनी कलिताकरवी झेलबाद केले.

तसेच मिशेल मुवांगा चौथी (६), तर नायशा ग्वानझुरू (१०) वैष्णवीची पाचवी शिकार ठरली. वैष्णवीने १० षटकात ३९ धावा देत पाच विकेट मिळवण्याची किमया केली. वैष्णवीनंतर क्रांती गौड व सायली सतघरेने प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.



राजस्थान रॉयलने राखले वर्चस्व

| पुणे | प्रतिनिधी |

पुना वेस्टर्न क्लब करंडक आंतरक्लब १३ वर्षाखालील मुलांच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेत राजस्थान रॉयल अकॅडमी संघाने प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवत सलग दोन सामने जिंकून विजयी आगेकूच केली. भुगाव येथील द पूना वेस्टर्न क्लब मैदानावर पार पडलेल्या पहिल्या सामन्यात राजस्थान रॉयल संघाने लाईनअप क्रिकेट अकॅडमीचा ६८ धावांनी पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना राजस्थान संघाने १८ षटकांत ४ बाद १८० धावांचा भक्कम डोंगर उभा केला. विराज फराटे याने ३७ चेंडूंत १० चौकार व ४ षटकारांसह नाबाद ७३ धावांची आक्रमक खेळी केली, तर त्याला वर्धन कुमार आणि आर्यन उचित यांनी उत्तम साथ दिली. प्रत्युत्तरात लाईनअप क्रिकेट अकॅडमीचा संघ ११२ धावांवर गारद झाला.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाची कमाई ३,५५० कोटींवर

| मुंबई | प्रतिनिधी |

अॅशेस कसोटी मालिका आणि भारताविरोधातील वनडे-टी २० मालिकेतून झालेल्या कमाईमुळे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये विक्रमी महसूल नोंदवला आहे. बोर्डाचे वार्षिक उत्पन्न ६०१.१ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर (सुमारे ३,५५० कोटी रुपये) राहिले. या काळात बोर्डाला ८१.८ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर (सुमारे ४८३ कोटी रुपये) निव्वळ नफा झाला. यापूर्वी आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये क्रिकेट ऑस्ट्रेलियाला ११.३ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलरचा तोटा झाला होता.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने बुधवारी जारी केलेल्या आपल्या वार्षिक आर्थिक अहवालात सांगितले की, मजबूत व्यावसायिक कामगिरी, विक्रमी प्रेक्षकसंख्या आणि यशस्वी आंतरराष्ट्रीय हंगामामुळे ही कामगिरी साध्य झाली. बोर्डाच्या माहितीनुसार, इंग्लंड विरोधात पुरुष संघाची घरच्या मैदानावरील अॅशेस कसोटी मालिका आणि भारताविरुद्धच्या व्हाइट-बॉल मालिकेमुळे मीडिया राइट्स, व्यावसायिक करार आणि सामन्याच्या दिवशी मिळणारा महसूल विक्रमी पातळीवर पोहोचला.



इंग्लंडविरुद्धच्या अॅशेस मालिकेत प्रेक्षकसंख्येने नवा विक्रम प्रस्थापित केला. मालिकेतील १८ दिवसांच्या खेळादरम्यान एकूण ८,५९,५८० प्रेक्षक स्टेडियममध्ये दाखल झाले. या काळात दररोज सरासरी ४७,७५४ प्रेक्षक उपस्थित होते.भारताविरुद्ध ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये खेळल्या गेलेल्या मर्यादित षटकांच्या मालिकेतूनही क्रिकेट ऑस्ट्रेलियाला चांगली कमाई झाली. ऑस्ट्रेलियाने वनडे मालिका २-१ ने जिंकली, तर भारताने २० मालिका २-१ ने आपल्या नावावर केली.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या विक्रमी कमाईसोबतच त्याच्या राष्ट्रीय संघांनी मैदानावरही चांगली कामगिरी केली. दरम्यान, ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाने अंतिम सामन्यात इंग्लंडचा पराभव करून आपले सातवे महिला २० विश्वचषक विजेतेपद पटकावले. या कामगिरीमुळे ऑस्ट्रेलियन क्रिकेटचा यशस्वी हंगाम आणखी खास ठरला.

ठाणे जिल्हा कबड्डी संघटनेची निवड चाचणी ३ नोव्हेंबरपासून

| ठाणे | प्रतिनिधी |

ठाणे जिल्हा कबड्डी असो. च्या वतीने रा .फ .नाईक व ग्रीफिन्स जिमखाना कोपरखैरणे यांच्या सहकार्याने ३४वी किशोर -किशोरी गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा, ३ ते ६ नोव्हेंबर या कालावधीत करीत आहे.

किशोर गटात अधिक संघ असल्याने प्रथम ५ विभागात बाद पद्धतीची स्पर्धा घेण्यात येऊन त्यातून २० पात्र संघांची ६ गटात विभागणी करण्यात आली. तर किशोरी गटात २९ संघांची ९ गटात विभागणी करण्यात आली आहे. या निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून ठाणे जिल्ह्याचा किशोर व किशोरी गटाचा संघ निवडण्यात येऊन तो पाथरी, परभणी येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करेल.

या संघ निवडी करिता जागेनिहाय निवड समिती गठीत करण्यात आली आहे. किशोर गट मुलांकरिता शशिकांत चव्हाण, निलेश शिंगरे, प्रदीप ठाकूर, राकेश मोरे, आदेश पाटील, शुभम दळवी, स्वप्निल पाटील, किशोरी गट मुलीकरिता दिपाली सुर्वे, प्रिया गुप्ता, स्वप्नाली जाधव, दिव्या मोरे, अश्विनी पाटील (उजवी चढाई), चैताली जाधव (बोराडे) (डावी चढाई), दर्शना सणस (अष्टपैलू), अशी माहिती संघटनेचे सचिव मालोजी भोसले यांनी एका पत्रकाद्वारे सर्व प्रसार माध्यमाना दिली.

श्रीलंकेने केला पाकिस्तानचा पराभव

| लाहोर | वृत्तसंस्था |

श्रीलंकेने पाकिस्तान वनडे ट्राय-सिरीजच्या पाचव्या सामन्यात पाकिस्तानचा ८ विकेट्सने पराभव केला. मंगळवारी लाहोरमध्ये पाकिस्तानचा संघ प्रथम फलंदाजी करताना २५.३ षटकांत ११० धावांवर सर्वबाद झाला.प्रत्युत्तरात श्रीलंकेने १८.१ षटकांत २ विकेट्स गमावत ११४ धावा करून सामना आपल्या नावावर केला. श्रीलंकेच्या विजयाचा नायक वेगवान गोलंदाज दिलशान मदुशंका ठरला, त्याने ५ विकेट्स घेतल्या. त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.



टॉसनंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. संघाने २३ धावांपर्यंत २ गडी गमावले. फखर जमान ५ आणि माज सदाकत ८ धावा करून बाद झाले. बाबर आझमने ३३ चेंडूंमध्ये २९ धावा करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र, त्याच्या बाद झाल्यानंतर पाकिस्तानचे गडी सातत्याने बाद होत गेले. साद बेग ५, कर्णधार सलमान आगा ९ आणि शादाब खान २ धावा करून बाद झाले. हसन नवाजने ३१ चेंडूंमध्ये १७ धावा केल्या, तर शाहीन शाह आफ्रिदीने १३ चेंडूंमध्ये १५ धावांचे योगदान दिले.

नीरज यादव यांचे निधन

नवी दिल्ली : आशियाई पॅरा गेम्समध्ये तीन सुवर्णपदके जिंकणारा भारतीय पॅरा-अॅथलीट नीरज यादव यांचा मृत्यू झाला आहे. ४२ वर्षीय पॅरा-अॅथलीटने विष प्राशन करून आत्महत्या केली आहे. त्यांनी मंगळवारी रात्री आपल्या अपार्टमेंटमध्ये आपले जीवन संपवले. सध्या, दिल्लीच्या जीटीबी रुग्णालयात त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन केले.

आट्यापाट्या राज्य अजिंक्यपद स्पर्धा

रायगड जिल्हा संघ जाहीर



| कापोली | प्रतिनिधी |

महाराष्ट्राचा पारंपरिक आणि मातीतील लोकप्रिय खेळ असलेल्या आट्यापाट्याच्या ३७ व्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेचे मानाचे यजमानपद यंदा रायगड जिल्ह्याला मिळाले आहे. श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील श्रीवर्धन क्रीडा संकुल येथे आगामी १२ ते १४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत हा भव्य राज्यस्तरीय क्रीडा संग्राम मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत यजमान रायगडचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अधिकृत मुले व मुलींचा संघ जाहीर करण्यात आला आहे.

रायगड जिल्हा मुलींच्या संघामध्ये कर्णधार अनुष्का पयेर, उपकर्णधार शर्वरी पाटील, संघ सदस्य लावण्या गुरव, जान्हवी महाडिक, श्रेया धुमाळ , सानवी गायकर, प्रचिती पाटील, श्रावणी केळस्कर, आर्या नाक्ती, स्विटी वडमारे , लावण्या पाटील, आर्या काप, कस्तुरी पाटील, आर्या कुटे, प्रांजल नागरगोजे, संघ व्यवस्थापक निशा धनावडे, संघ प्रशिक्षक: संकेत पाटील, उत्कर्ष पाटील, यांचा समावेश आहे. रायगड जिल्हा मुलांच्या संघामध्ये कर्णधार आदित्य शिगवण, उपकर्णधार नील सातमकर, संघ सदस्य आर्य खराडे, आदित्य जायभाये, धनंजय चौगुले, वासू शिंदे, अंश हेदुकर, ऋग्वेद भाटकर, सार्थक नांदविडकर, सार्थक धनावडे, ओम फर्डे, स्वराज पवार, रुद्र पडवळ, खुश शेडगे, स्वप्नील मोहड, संघ व्यवस्थापक दीप पयेर, संघ प्रशिक्षक निखिल तोडणकर, कौशल नांदविडकर यांचा समावेश आहे.

ठाण्यात १ नोव्हेंबरला यंग इंडिया राज्यस्तरीय मॅरेथॉन

| ठाणे | प्रतिनिधी |

अॅथलिट्सतर्फे १ नोव्हेंबर रोजी यंग इंडिया राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत पुरुष आणि महिला गटांसाठी २१ किलोमीटर अंतराची अर्ध मॅरेथॉन, तसेच पुरुष आणि महिला गटांसाठी १० किलोमीटर अंतराची शर्यत आयोजित करण्यात आली आहे.

१९ वर्षांखालील मुला-मुलींसाठी १० किलोमीटर, १५ वर्षांखालील मुला-मुलींसाठी ५ किलोमीटर आणि १२ वर्षांखालील मुला-मुलींसाठी ३ किलोमीटर अंतराची शर्यत होणार आहे. याशिवाय ५० वर्षांवरील ज्येष्ठ पुरुष आणि महिलांसाठीही ३ किलोमीटर अंतराची शर्यत असेल.



या स्पर्धेचे खास आकर्षण म्हणजे ठाणे जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात येणारी एक किलोमीटरची फॅमिली रन. या शर्यतीत १० वर्षांखालील मुलांसोबत त्यांचे आई-वडील सहभागी होऊ शकतील. कुटुंबासह धावण्याचा आनंद घेण्याची संधी या उपक्रमातून मिळणार आहे.

निवडक

चेन्नईचे असिस्टंट कोच बनले एल्बी मॉर्केल

चेन्नई : चेन्नई सुपर किंग्सने २०२७ पूर्वी दक्षिण आफ्रिकेचे माजी अष्टपैलू खेळाडू एल्बी मॉर्केल यांची सहाय्यक प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. ते जहीर खान यांच्या नेतृत्वाखालील नव्या प्रशिक्षक संघाचा भाग असतील. फ्रँचायझीने आतापर्यंत ५ विजेतेपदे जिंकली आहेत. मॉर्केल अयपीएलच्या पहिल्या हंगामापासून म्हणजेच २००८ ते २०१३ या कालावधीत चेन्नई संघाचा भाग होते. या काळात त्यांनी कडून ९२ सामने खेळले.



त्यांच्या उपस्थितीत संघाने २०१० आणि २०११ मध्ये अयपीएलचे विजेतेपद पटकावले. याशिवाय चेन्नईने २०१० मध्ये चॅम्पियन्स लीग टी-२०चे विजेतेपदही जिंकले होते. मॉर्केल जुलै २०२६ मध्ये २०मधील जोबर्ग सुपर किंग्स संघाचे मुख्य प्रशिक्षक झाले होते. या भूमिकेत त्यांनी स्टीफन फ्लेमिंग यांची जागा घेतली होती. चेन्नईने इंग्लंडचा माजी क्रिकेटपटू गॅरेथ बॅटी यांचीही सहाय्यक प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. त्याचवेळी भारताचा माजी वेगवान गोलंदाज मोहित शर्मा संघाचा नवा गोलंदाजी प्रशिक्षक असेल. मोहितनेही आपल्या कारकिर्दीची सुरुवात चेन्नईकडूनच केली होती. मोहितने सांगितले की, मध्ये पुनरागमन करणे म्हणजे त्याच्यासाठी घरी परतल्यासारखे आहे.

केन ठरला बॅलन डी ओरचा मानकरी

लंडन : गेल्या हंगामातील उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर इंग्लंडचा स्टार फुटबॉलपटू हॅरी केनने मानाचा बॅलन डी ओर पुरस्कार पटकावला आहे. २००१ मध्ये मायकल ओवेननंतर, हा सन्मान मिळवणारा तो पहिला इंग्लिश फुटबॉलपटू ठरला आहे.केनने क्लब आणि देशासाठी खेळताना गेल्या हंगामात एकूण ७३ गोल करत युरोपमधील शीर्ष गोलरचा मान मिळवला तसेच जर्मनीतील बायर्न म्युनिक आणि विश्वचषक स्पर्धेत विक्रमी गोलसंख्या नोंदवली. अवघ्या ३३ वर्षांच्या केनने आपल्या सुरुवातीच्या कारकीर्दीतील संघर्षावर मात करत हे यश संपादन केले आहे. कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर काहीही शक्य होते. माझा प्रवास सोपा नव्हता आणि मी तळापासून मेहनत करून आज



सर्वोत्तम स्थान मिळवले आहे, अशी भावना केनने पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केली. केनच्या पाठोपाठ या मतदानात किलियन एम्बाप्पे, लॅमिन यामल, रॉड्री आणि लिओनेल मेस्सी यांचा समावेश होता. केनने आपल्या सहकाऱ्यांचे, प्रशिक्षकांचे, पालकांचे आणि पत्नी केटचे आभार मानले. त्याच्या नेतृत्वाखाली बायर्न म्युनिक संघाने बुंडेस्लिगा आणि जर्मन कपचे द्विकम मुकुट जिंकले. तसेच विश्वचषक स्पर्धेत सहा गोल करत त्याने गॅरी लिनेकरचा विक्रम मोडून इंग्लंडतर्फे विश्वचषकात सर्वाधिक गोल करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. इंग्लंडने या स्पर्धेत तिसरे स्थान पटकावले, जी गेल्या ६० वर्षांतील त्यांची सर्वोत्तम कामगिरी ठरली.इंग्लंडचे प्रशिक्षक थॉमस टुशेल यांनी केनचे कौतुक करताना संघामध्ये त्याच्यासारखा खेळाडू असणे अभिमानास्पद असल्याचे सांगितले.




१२ खेळाडूंना मिळणार २४ लाख रुपये

मुंबई : आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये निवड झालेल्या राज्यातील १२ खेळाडूंना प्रशिक्षण आणि स्पर्धेच्या अनुषंगाने आर्थिक सहाय्य देण्यासाठी राज्य सरकारने २४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यानुसार प्रत्येक खेळाडूला दोन लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. राज्याच्या क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना आर्थिक मदत करणे, या उद्देशाने राज्य क्रीडा विकास निधीला अंशदान देण्याची योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत आर्थिक वर्षांतील पात्र खेळाडूंच्या प्रस्तावांची तपासणी करून क्रीडा आणि युवक सेवा संचालनालयाने शिफारशींसह प्रस्ताव सादर केला होता. उपमुख्यमंत्री तथा क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली ५ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला होता. अर्थसहाय्यासाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये जिम्नॅस्टिक्समधील सोहम संजोग ढोले, पॅरा बॅडमिंटनमधील आरती ज्ञानोबा पाटील, निलेश बाळू गायकवाड, प्रेम कुमार आले, यशोधन विजयकुमार रावणकुळे आणि लताताई परमेश्वर उमरेकर यांचा समावेश आहे.

हार्दिकसाठी सहा फ्रँचायझी सज्ज

मुंबई : मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या याच्या नावाने इंडियन प्रीमिअर लीग २०२७ च्या लिलिवापूर्वीच बाजार ढवळून निघाला आहे. हार्दिक मुंबई इंडियन्सची साथ सोडणार अशी नुसत्या चर्चा सुरू झाल्या आणि या ऑल राऊडंरला आपल्या ताफ्यात घेण्यासाठी सहा फ्रँचायझींनी फिल्डिंग लावली आहे. मुंबईकडून गुजरात टायटन्सकडे गेल्यानंतर हार्दिकने कर्णधार म्हणून पहिल्याच प्रयत्नात गुजरात टायटन्सला आयपीएल जेतेपद



जिंकून दिले आणि पुढील पर्वात उपविजेतेपदापर्यंत पोहोचवले. त्याम ुळेच मुंबई इंडियन्सने पुन्हा आपल्या जुन्या सहकाऱ्याला ताफ्यात घेतले आणि कर्णधार केले, पण हा डाव फसला. हार्दिकच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सला मागील तीन पर्वात काही खास कामगिरी करता आली नाही. त्यामुळेच हार्दिक व फ्रँचायझी यांच्यातले संबंध बिघडल्याची चर्चा रंगली. दरम्यान, हार्दिकने दुखापतीमुळे आयपीएल २०२६ च्या शेवटच्या टप्प्यातून माघार घेतली आणि त्यावेळी त्याने चेन्नई सुपर किंग्ससोबत चर्चा सुरू केल्याचे वृत्त आले. मुंबई इंडियन्सकडून किंवा हार्दिककडून त्याबाबत अधिकृत काहीच जाहीर करण्यात आले नसले तरी सूत्रांनी हार्दिक पुढील पर्वात पिवळ्या जर्सीत दिसेल असा दावा केला.

सुयोग, ओंकार, उपेंद्र, अनघा यांना अजिंक्यपद | युनिव्हर्सिटी पॅव्हेलियनमध्ये स्पर्धेचे आयोजन

टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंचे वर्चस्व

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबई शहर जिल्हा टेबल टेनिस संघटना आणि कल्पवृक्ष पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिसऱ्या महाराष्ट्र राज्य मास्टर्स मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतर्फे पुण्याच्या सुयोग पाटील, ओंकार जोग, उपेंद्र मुळ्ये यांच्यासह सोलापूरच्या मनीष रावत आणि मुंबई शहरच्या अनघा जोशी यांनी आपापल्या वयोगटांत विजेतेपद संपादन केले.

मुंबईतील मरीन लाईन्स येथील युनिव्हर्सिटी पॅव्हेलियनमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंनी जोरदार छाप पाडली.



४० वर्षांवरील पुरुष गटाच्या अंतिम फेरीत तिसऱ्या मानांकित सुयोग पाटीलने पहिल्या दोन गेममधील पिछाडी भरून काढत अव्वल मानांकित सहकारी संतोष वाक्राडकरवर ९-११, ९-११, ११-८, ११-७, ११-८ अशी पाच गेममध्ये रोमांचक मात केली आणि विजेतेपद पटकावले.

सुवर्णपदकाला घातली गवसणी

४५ वर्षांवरील पुरुष गटात पुण्याच्या ओंकार जोगने एकतर्फी लढतीत ठाण्याच्या सातव्या मानांकित सागर कुलकर्णीचा ११-१, ११-३, ११-७ असा सरळ गेममध्ये फडशा पाडला. ५० वर्षांवरील पुरुषांच्या अंतिम सामन्यात तिसऱ्या मानांकित उपेंद्र मुळ्येने (पुणे) अव्वल मानांकित नचिकेत देशपांडेचे कडवे आव्हान १४-१२, १२-१०, ७-११, ११-८ असे मोडून काढले.

५५ वर्षांवरील पुरुषांच्या गटात अव्वल मानांकित मनीष रावतने (सोलापूर) मुंबई शहरच्या नवीन सॅलियनचा ११-४, १२-१०, ११-७ असा पराभव करत जेतेपदावर नाव कोरले. तर ५५ वर्षांवरील महिलांच्या अंतिम फेरीत मुंबई शहरच्या अव्वल मानांकित अनघा जोशीने ठाण्याच्या दुसऱ्या मानांकित तृप्ती माचवेचा ११-७, ९-११, ११-६, ११-७ असा चार गेममध्ये पराभव करून सुवर्णपदकाला गवसणी घातली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)